## ऑक्सरसाठी ‘गोंधळ’ची निवड

**नवी दिल्ली :** अकरा वर्षांपूर्वी ‘कोर्ट’ या मराठी चित्रपटाला हिंदुस्थानची अधिकृत ऑस्कर प्रवेशिका म्हणून निवडले गेले होते. त्यानंतर आता ‘गोंधळ’च्या रूपाने पुन्हा एकदा महाराष्ट्राला आणि मराठी चित्रपटसृष्टीला ऑस्करच्या व्यासपीठावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. ‘डोरोथी’, ‘बालन’, ‘बायसन’, ‘अंग’, ‘मैं वापस आऊंगा’, ‘धुरंधर -१, ‘धुरंधर -२ ’, ‘इक्कीस’, ‘बॉर्डर २’, ‘देऊळबंद २’ आणि ‘द शेप ऑफ मोमो’ यांसारखे विविध भाषांतील अनेक दर्जेदार आणि चर्चित चित्रपट अधिकृत ऑस्कर प्रवेशाच्या शर्यतीत होते. काही चित्रपटांना आंतरराष्ट्रीय महोत्सवांची पार्श्वभूमी होती, तर काही चित्रपटांमागे मोठे कलाकार आणि प्रचंड व्यावसायिक ताकद होती.


१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग








**रायगड** शनिवार । दि. १९ सप्टेंबर २०२६ । अंक १०४ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


**वे|ध|क**

## ‘तृणमूल’चं नाव, चिन्ह गोठवलं

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसमधील नेतृत्वाच्या वादाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने पक्षाचे ‘ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे अधिकृत नाव आणि ‘फुले व गवत’ हे निवडणूक चिन्ह तात्पुरते गोठवण्याचा अंतरिम आदेश दिला आहे. पश्चिम बंगालमधील नंदीग्राम आणि रेझिनगर विधानसभा मतदारसंघांच्या ६ ऑक्टोबरला होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने हा अंतरिम आदेश दिला आहे. तृणमूल काँग्रेसच्या दोन गटांमध्ये पक्षाच्या नाव आणि निवडणूक चिन्हावरून वाद सुरू असून, या वादाचा अंतिम निर्णय होईपर्यंत दोन्ही गटांना ‘ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव किंवा ‘फुले व गवत’ हे चिन्ह वापरता येणार नाही. या निर्णयावर संताप व्यक्त करण्यात येत आहे.

# पडीक जमिनी होणार आता शासनजमा!

**रायगड जिल्हा प्रशासन लावणार चाप**

**२११ कंपन्यांना नोटिसा**

**तब्बल १,५७० हेक्टर जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू**

। प्रमोद जाधव ।
। रायगड ।

उद्योग उभारण्याच्या नावाखाली जमीन संपादित करायची आणि वर्षानुवर्षे ती जमीन तशीच पडून ठेवायची, या प्रकाराला आता रायगड जिल्हा प्रशासनाने चाप लावण्याची तयारी केली आहे. प्रकल्पासाठी जमीन संपादित करूनही तब्बल १५ वर्षांच्या कालावधीत उद्योग उभारला नाही, अशा जिल्ह्यातील २११ कंपन्यांना महसूल विभागाने नोटिसा बजावल्या आहेत. या कंपन्यांकडील तब्बल १ हजार ५७० हेक्टर जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली असून, त्यामुळे वर्षानुवर्षे वापराविना पडून असलेल्या या जमिनी शासनजमा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पान २ वर

### प्रशासनाच्या निर्णयाकडे रायगडचे लक्ष

औद्योगिक प्रकल्पांसाठी संपादित केलेली जमीन संबंधित उद्देशासाठी वापरली गेली नाही, तर त्या जमिनीच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे वर्षानुवर्षे जमीन ताब्यात ठेवून प्रत्यक्ष प्रकल्प न उभारणाऱ्या कंपन्यांकडील जमिनीबाबत प्रशासनाने आता भूमिका कठोर केली आहे. एकीकडे शेतीसाठी जमीन कमी होत असताना दुसरीकडे उद्योगाच्या नावाखाली संपादित केलेली हजारो हेक्टर जमीन वापराविना पडून राहणे, हा गंभीर विषय आहे. त्यामुळे २११ कंपन्यांकडील १ हजार ५७० हेक्टर जमिनीबाबत प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे रायगडचे लक्ष लागले आहे.




### ६६६ कंपन्यांनी केली जमीन संपादित

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये पाच हजारांहून अधिक हेक्टर जमीन सुमारे ६६६कंपन्यांकडून संपादित करण्यात आली होती. यातील २११ कंपन्यांनी जमीन संपादित केल्यापासून १५ वर्षे उलटूनही संबंधित जमिनीवर उद्योग उभारलेला नसल्याचे प्रशासनाच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. प्रकल्पासाठी घेतलेल्या संपादित जमिनींचे प्रशासनाकडून सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर वापराविना पडून असलेल्या जमिनींची माहिती संकलित करून संबंधित कंपन्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

> **औद्योगिक कारणासाठी खरेदी केलेल्या जमीनीबाबतचे शासनाने विहीत केलेल्या कालावधीत खराखुरा औद्योगिक वापर करणे आवश्यक आहे. शासनाने विहीत केलेल्या कालावधीत वापरात न आणलेल्या जमिनीबाबत उक्त अधिनियमामातील तरतुदीनुसार, संबंधित जमीनधारकांना नोटीस काढून सुनावणी घेण्यात आली आहे. तहसीलदारांनी सादर केलेल्या माहितीनुसार, संकलित करण्यात आली आहे. सुनावणीअंती अधिकार अभिलेखांची पडताळणी करुन सदर जमीन कोणत्या तरतुदीनुसार खरेदी करण्यात आल्या आहेत. याबाबत खात्री करून त्यानुसार, शासन तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.**
> **– सचिन ढोले, अपर जिल्हाधिकारी, रायगड**

# म्हसळा पुन्हा हादरलं!

- **अल्पवयीन मुलीवर पाच जणांकडून लैंगिक अत्याचार**
- **आरोपींविरोधात गुन्हा दाखल**

। म्हसळा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातून एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच ओळखीच्या व्यक्तींनी तसेच घराचे काम करणाऱ्या मिस्त्रीने वेगवेगळ्या कालावधीत वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. धमकावून, फसवून आणि घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत हा प्रकार केल्याची तक्रार पीडितेने केली आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार ऑगस्ट २०२५ ते जुलै २०२६ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार, वाशी हवेली, ता. तळा येथील आरोपी व त्याच्या साथीदारांनी



तिला धमकावून तसेच फसवून वेळोवेळी बोलावून तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीत पीडितेच्या घराचे काम करणाऱ्या मिस्त्रीने मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत जबरदस्तीने घरात प्रवेश करून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे म्हसळा तालुक्यात खळबळ उडाली आहे. पान २ वर

## दिल्लीत १६ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या उत्तरेकडच्या भागात १६ वर्षीय मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिची चाकूने हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तिची हत्या करून तिचा मृतदेह शेतात फेकण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. मृतदेह इतका कुजला होता की सुरुवातीला तो महिलेचा आहे की पुरुषाचा, हेही स्पष्टपणे ओळखता आले नव्हते. या प्रकरणात तीन अल्पवयीन मुलांसह चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना १० सप्टेंबरच्या रात्री घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मुलगी तिच्या १७ वर्षीय मित्राला भेटण्यासाठी गेली होती. त्याने आपल्या तीन मित्रांना बोलावले. काही वेळ एकत्र घालवल्यानंतर चौघांनी तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे.



● शुक्रवारी विराजमान झालेल्या गौराई मातेची महिलांनी मनोभावे पूजन केले. अलिबागमधील पाटील वाडी येथील पाटील कुटुंबाच्या या गौराई मातेची पूजा करण्यासाठी आणि सुपं ओवसण्यासाठी सुवासिनींनी गर्दी केली होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

# सात तालुक्यांना डेंग्यूचा धोका

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये साडे आठ महिन्यांत ४००हून अधिक डेंग्यूचे रुग्ण सापडले आहेत. ग्रामीण भागापेक्षा पनवेलमधील शहरी भागात आणि अलिबाग तालुक्यात डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण आढळले आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या काही महिन्यांपासून डेंग्यूने थैमान घातला आहे. डेंग्यूला रोखण्यासाठी आरोग्य विभाग कामाला लागले आहे. डेंग्यू संसर्गजन्य आजार आहे. त्यामुळे शहराबरोबरच



### डेंग्यू रोखण्यावर दृष्टीक्षेप

घरांच्या परिसरात अथवा टेरेसवर पडलेल्या रिकाम्या कुंड्या, प्लॅस्टिकच्या वस्तू, टायर यासारख्या वस्तूंमध्ये पावसाचे पाणी साचून ठेवल्यास एडीस डासांची उत्पत्ती स्थाने निर्माण होतात. अशी ठिकाणे नष्ट करावीत. सखल भागात साचलेले पाणी काढून तो भाग कोरडा करावा. खिडक्यांना जाळ्या बसवून घरात डासांच्या शिरकावास प्रतिबंध करावा. आपल्याला डास चावणार नाहीत, यासाठी सर्वतोपरी बंदोबस्त करावा. आजाराची लक्षणे आढळून आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असा मोलाचा सल्ला वैद्यकिय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

> डेंग्यूला रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर वेगवेगळ्या बैठका घेणे. ताप आलेल्या ठिकाणी गावांतील नागरिकांना मार्गदर्शन करणे. उपाययोजना करणे अशा अनेक प्रकारचे उपक्रम राबविले जातात. सध्या पावसाळी हंगाम या कालावधीत सखल भागात पाणी साचल्याने डासाची पैदास होऊन डेंग्यू होण्याचा धोका आहे. ताप आल्यावर अंगावर न काढता, जवळच्या दवाखान्यात जाऊन तपासणी करावी. औषधोपचार त्यांच्या मार्गदर्शनातून करावा. तसेच आरामदेखील करावे. डासांची उत्पत्ती होणार नाही, याची काळजी नागरिकांनी घ्यावी.
> – अनिल पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी, रायगड

**साडेआठ महिन्यांत चारशे रुग्ण आढळले**

**ऐन गणेशोत्सवात डेंग्यू वाढण्याची भीती**

**पनवेलमधील शहरी भागासह अलिबाग तालुक्यात सापडले सर्वाधिक रुग्ण**

ग्रामीण भागातदेखील तापाचे रुग्ण वाढण्याचा धोका आहे. ऐन गणेशोत्सवात डेंग्यू वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

रायगड जिल्हा पर्यटनासह औद्योगिक जिल्हा म्हणून नावारूपाला आला आहे. जिल्ह्यात वेगवेगळे प्रकल्प उभे राहण्याबरोबरच नवीन जागा घेऊन फार्महाऊस इतर बंगले बांधण्याचा क्रेझ वाढला आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात पान २ वर

## शिंदेंच्या हेलिकॉप्टरचे महाडमध्ये लँडिंग

**महाड :** महाबळेश्वर परिसरातील अचानक बिघडलेल्या हवामानामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यात अनपेक्षित बदल झाला. दरे गावाकडे हेलिकॉप्टरने जात असताना परिसरात दाट धुके आणि वाऱ्याचा वेग वाढल्याने सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्या हेलिकॉप्टरचे महाड येथे लँडिंग करण्यात आले. त्यानंतर रस्तेमार्गे त्यांचा ताफा दरे गावाच्या दिशेने रवाना झाला.मिळालेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रायगड दौऱ्यानंतर दरे गावाकडे हेलिकॉप्टरने रवाना झाले होते. मात्र, महाबळेश्वर घाट परिसरातील प्रतिकूल पान २ वर

# बोर्ड परीक्षांच्या तारखा जाहीर!

**दहावीची १५, तर बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारीपासून**

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील लाखो दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च२०२७मध्येहोणाऱ्या दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारीपासून, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे.

इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सोमवार, १५ फेब्रुवारी ते गुरुवार, ११ मार्च २०२७ या कालावधीत घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू झाली



होती. त्यामुळे यंदाची परीक्षा पाच दिवस आधी सुरू होणार आहे. दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहे.

बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे. तर बारावीच्या प्रात्यक्षिक, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

# मुंबई-गोवा महामार्ग खर्चाने फुगला!

- **११ हजार ४०९ कोटींचा प्रकल्प १६ हजार ९०९ कोटींवर**
- **४८ टक्के खर्चात वाढ; काम अपूर्णच**

। मुंबई । प्रतिनिधी ।

कोकणवासियांच्या सुरक्षित प्रवासाचे स्वप्न अजूनही अधुरेच; मात्र महामार्गाच्या खर्चाचा आकडा मात्र सुसाट धावत आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६च्या चौपदरीकरणाला केंद्राची मंजुरी मिळून १७ वर्षे उलटली. मूळ मंजूर किंमत ११ हजार ४०९ कोटी रुपये होती; ती आता तब्बल १६ हजार ९०९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच, तब्बल ५ हजार ५०० कोटींची वाढ आणि ४८ टक्के खर्चवाढ झाली आहे. खर्च वाढतच आहे; हजारो कोटी रुपये खर्चही झाले आहेत; पण महामार्गाच्या पूर्णत्वाची तारीख मात्र अद्याप निश्चितपणे समोर येत नाही. उलट, काही भाग अपूर्ण राहिल्याने प्रवाशांचा जीव धोक्यात येत आहे.

या रखडलेल्या महामार्गावर अपघातांची मालिकाही थांबलेली नाही. इंदापूर ते कशेडी या सुमारे ७० किलोमीटरच्या पट्ट्यात एका नऊ महिन्यांच्या कालावधीत ६९ अपघातांत ३६ प्रवाशांचा मृत्यू आणि ७९ जण गंभीर जखमी झाल्याची नोंद आहे. त्यामुळे हा केवळ रखडलेला रस्ता नाही, तर वेळेत पूर्ण न झालेल्या कामाची किंमत प्रवाशांना जीव देऊन मोजावी लागत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

‘द यंग पान २ वर

### कोकणाच्या वाट्याला फक्त आश्वासने

मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणाच्या अर्थव्यवस्थेची आणि दळणवळणाची जीवनवाहिनी आहे. पर्यटन, व्यापार आणि स्थानिक व्यवसायांसाठी त्याचे महत्त्व मोठे आहे. मात्र, महामार्ग पूर्ण करण्याची आश्वासने वर्षानुवर्षे मिळत असताना खर्चाचा आकडा मात्र सतत वाढत आहे. १७ वर्षे झाली, हजारो कोटी रुपये खर्च झाले, मूळ अंदाजापेक्षा साडेपाच हजार कोटींची वाढ झाली; तरीही महामार्ग पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यावर नेमका कधी पोहोचणार, याचे उत्तर अजूनही अनिश्चितच आहे.

# कामोठेच्या सांडपाणी केंद्रासाठी ३५ कोटींची निविदा

- **८५ एमएलडी केंद्राचे दुरुस्ती-नूतनीकरण**
- **दोन वर्षे देखभालीचीही जबाबदारी**

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

कामोठे परिसरातील सांडपाणी व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी पनवेल महापालिकेने मोठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. कामोठे सेक्टर-३२ येथील ८५ एमएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी ३५ कोटी २० लाख रुपयांचा अंदाजित खर्च ठेवण्यात आला आहे. या कामाची निविदा भरण्याची अंतिम तारीख २२ सप्टेंबर २०२६ आहे.

कामोठे परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढली आहे. गृहसंकुले, व्यापारी आस्थापना आणि नागरिकांची संख्या वाढत असताना सांडपाण्याचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे उपलब्ध प्रक्रिया केंद्राची यंत्रणा चांगल्या स्थितीत ठेवणे महत्त्वाचे ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेने केंद्रातील आवश्यक दुरुस्ती आणि नूतनीकरणाची कामे हाती घेतली आहेत.

निविदेतील महत्त्वाची बाब म्हणजे केवळ दुरुस्ती करून काम संपणार नसून संबंधित कंत्राटदारावर पुढील दोन वर्षे केंद्राच्या देखभालीची जबाबदारीही पान २ वर

**कृषी विभागाकडून ऑनलाइन पोर्टल सुरू | जमीन नावावर नसली तरी अर्ज करण्याचे आवाहन**

# महिलांना मिळणार शेतकरी म्हणून अधिकृत ओळख

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतीच्या कामात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष राबणाऱ्या महिलांना आता ‘शेतकरी’ म्हणून अधिकृत ओळख मिळणार आहे. रायगड जिल्ह्यातील पात्र महिलांसाठी कृषी विभागाने महिला शेतकरी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे. या माध्यमातून पात्र महिलांना अर्ज करून प्रमाणपत्र मिळवता येणार असून, शासकीय कृषी योजना, कर्ज, विमा आणि विविध कृषी सेवांचा लाभ थेट महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. कृषी क्षेत्रातील महिलांचे योगदान अधिकृतपणे नोंदविण्यास या निर्णयामुळे मदत होणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिली.

शेती आणि शेतीपूरक व्यवसायात प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीरओळखदेण्याच्याउद्देशाने महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ लागू केला आहे. महिला शेतकऱ्यांना शासकीय कृषी योजना, कर्ज, विमा तसेच विविध कृषी सेवांचा लाभ मिळवून देण्यासाठी या कायद्यात तरतुदी करण्यात आल्या आहेत.




या कायद्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलेच्या नावावर जमीन असणे ही शेतकरी म्हणून ओळख मिळविण्यासाठी अनिवार्य अट राहणार नाही. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या तसेच शेतीशी संबंधित कामात सहभागी असलेल्या महिलांनाही शेतकरी म्हणून प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे केवळ जमीनमालकीच्या कागदपत्रांवर आधारित न राहता प्रत्यक्ष शेतीत योगदान देणाऱ्या महिलांना शेतकरी म्हणून अधिकृत मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन महिला शेतकरी तसेच शेतमजुरांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतीच्या प्रत्यक्ष कामात योगदान देऊनही आजपर्यंत स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत ओळख न मिळालेल्या महिलांना या प्रमाणपत्राचा लाभ घेता येणार आहे.

महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळखमिळावीयासाठीराज्याच्या कृषी विभागाने पान २ वर

# १९ सप्टेंबरपासून मान्सूनचा परतीचा प्रवास

- **ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान तीन चक्रीवादळांचे संकेत**
- **परतीच्या पावसानंतर अवकाळीचेही संकट**

। पुणे । प्रतिनिधी ।

मान्सूनच्या परतीची चाहूल लागली असली, तरी पावसाचा धोका अद्याप टळलेला नाही. एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतात खरीप पिके काढणीच्या उंबरठ्यावर असताना, दुसरीकडे परतीचा पाऊस आणि त्यानंतर अवकाळी पावसाची शक्यता कायम असल्याने बळीराजाची चिंता वाढली आहे. १९ सप्टेंबरपासून राजस्थानातून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होण्याची शक्यता असून, सप्टेंबरअखेर किंवा ऑक्टोबरच्या सुरुवातीला तो महाराष्ट्रातूनही माघारी फिरू शकतो. मात्र, याच काळानंतर बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रात हवामानातील हालचाली वाढण्याची शक्यता असल्याने पुढील तीन महिने पावसाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत.

भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) स्पेस ॲप्लिकेशन सेंटरच्या माध्यमातून केलेल्या हंगामी मॉडेलच्या अंदाजानुसार, ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान उत्तर हिंद महासागरावर तीन उष्णकटिबंधीय चक्रीवादळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला तरी पावसाचे सत्र पूर्णपणे थांबणार नसल्याचे संकेत मिळत आहेत.

इस्रोच्या स्पेस ॲप्लिकेशन सेंटरकडून देण्यात आलेल्या या अंदाजासाठी ‘क्युम्युलेटिव्ह पॉवर डिसिपेशन इंडेक्स’ या गणितीय मॉडेलचा वापर करण्यात आला आहे. शास्त्रज्ञांनी चक्रीवादळांच्या निर्मितीशी संबंधित ४४ वर्षांची सरासरी तपासून हा हंगामी अंदाज तयार केला आहे. समुद्राच्या पृष्ठभागाचे वाढलेले तापमान, वातावरणातील आर्द्रता आणि मोसमी वाऱ्यांची स्थिती चक्रीवादळांच्या निर्मितीस पोषक ठरू शकते. बंगालचा उपसागर हा अरबी समुद्राच्या तुलनेत अधिक चक्रीवादळनिर्मितीस पोषक असल्याने या भागातील हवामानावर विशेष लक्ष राहणार आहे.

१९ सप्टेंबरपासून राजस्थानातून मान्सून माघारी फिरण्याची शक्यता आहे. त्यानंतर सप्टेंबरअखेर महाराष्ट्रातूनही मान्सून परतीचा प्रवास सुरू करू शकतो.

# कशेडीच्या भुयारात काळोख

- विद्युत पुरवठ्याच्या लपंडावामुळे फ्लड लाइट्स, व्हेंटिलेशन बंद
- गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासात अपघाताचा धोका

| पोलादपूर | प्रतिनिधी |

**मुंबई-गोवा महामार्ग क्र. ६६ वरील कशेडी घाटाला पर्यायी ठरलेल्या भुयारी मार्गातच आता काळोख आणि कोंदटपणाचे संकट निर्माण झाले आहे. भुयारातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने फ्लड लाइट्स आणि व्हेंटिलेशन व्यवस्था बंद पडत आहे. त्यामुळे वाहनांच्या हेडलाईटच्या उजेडावरच प्रवास करण्याची वेळ येत असून, गणेशोत्सवानंतर चाकरमानी गणेशभक्तांचा परतीचा प्रवास सुरू असताना हा प्रकार धोकादायक ठरण्याची शक्यता आहे.**



(छायाचित्र : शैलेश पालकर)

कशेडी घाटातील तीव्र वळणे आणि धोकादायक प्रवास टाळण्यासाठी दोन समांतर भुयारी मार्गातून वाहतूक सुरू करण्यात आली. मात्र, ज्या भुयारी मार्गातून सुरक्षित आणि वेगवान प्रवास अपेक्षित होता, तेथेच अंधाराचे साम्राज्य दिसून येत आहे. विशेषतः खेड दिशेकडील दुसऱ्या भुयारात प्रवेश केल्यानंतर मध्यभाग आणि पुढील आतील भागात प्रकाशव्यवस्था अपुरी असल्याचे दिसते. छतावरील कातळातून कोसळणाऱ्या पाण्यामुळे रस्ता ओला असताना वाहनांच्या हेडलाईटच्या प्रकाशावरच वाहनचालकांना मार्ग काढावा लागत आहे.

कशेडीचे दोन्ही भुयारी मार्ग साधारण दोन किलोमीटर लांबीचे आहेत. प्रकाशव्यवस्था आणि प्रभावी वायुवीजन सुरू राहण्यासाठी महावितरणचा विद्युत पुरवठा सुरू होण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पोटठेकेदार कंपनी 'एसडीपीएल'चे अमोल शिवतारे यांना तातडीची विद्युत पुरवठा योजना सुरू करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार खासगी इमर्जन्सी पॉवर स्टेशन सुरू करण्यात आले; मात्र त्यात वारंवार नादुरुस्ती होत असल्याने तसेच फ्लड लाइट्स आणि व्हेंटिलेशनसाठी पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध होत नसल्याने समस्या कायम आहे.

गणेशोत्सवानंतर दोन, पाच आणि अकरा दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन झाल्यानंतर चाकरमान्यांचा परतीचा प्रवास मोठ्या प्रमाणात सुरू होतो. यावेळी कोकणाकडे जाणाऱ्या गर्दीच्या तुलनेत वाहतूक कमी असली तरी भुयारातील काळोख आणि कोंदटपणा कायम राहिल्यास वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तात्काळ प्रकाश व वायुवीजन व्यवस्था सुरळीत करण्याची गरज आहे.

### भुयाराबाहेरही अंधाराची वाट

केवळ भुयाराच्या आतील प्रकाशव्यवस्थेचीच समस्या नाही. भुयारी मार्गाच्या प्रवेशद्वार परिसरासह बाहेरील सुमारे अर्धा किलोमीटर महामार्गावरील बहुतांश स्ट्रीट लाईटही बंद असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे भुयारी मार्गाचा परिसरही रात्रीच्या वेळी अंधाराच्या विळख्यात असल्याचे चित्र आहे.

# पनवेलमध्ये आधुनिक प्रजनन केंद्राची मुहूर्तमेढ

- आयव्हीएफ उपचारांसह रुग्ण शिक्षणाचीही सुविधा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

नवी मुंबई आणि रायगड परिसरातील कुटुंबांसाठी प्रजनन उपचार अधिक सुलभ करण्याच्या दिशेने पनवेलमध्ये अत्याधुनिक प्रजनन केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. एक्सिजेन आयव्हीएफने पनवेल येथे सुमारे पाच हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे नवीन प्रजनन केंद्र सुरू केले असून, प्रगत भ्रूणविज्ञान, निदान सेवा, वैयक्तिकृत उपचार पद्धती, डिजिटल प्रयोगशाळा प्रणाली आणि रुग्ण शिक्षण अशा विविध सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

एक्सिजेन आयव्हीएफचे संस्थापक, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. गौतम दफ्तरी आणि सर्जिकल पॅथॉलॉजिस्ट व न्यूरो-ऑन्कोलॉजी तज्ज्ञ डॉ. गिरीश ए. मुजुमदार यांच्या हस्ते पनवेल येथील केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. गुणवत्ता, पारदर्शकता आणि क्लिनिकल गव्हर्नन्स या तत्त्वांवर केंद्राची रचना करण्यात आली आहे. नवी मुंबई, रायगड आणि आसपासच्या शहरांमध्ये पुरावा-आधारित प्रजनन सेवा उपलब्ध करून देणे हे या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या केंद्रातील भरत दफ्तरी नॉलेज सेंटर (बीडीकेसी) हे प्रमुख आकर्षण आहे. नवी मुंबई आणि रायगड परिसरातील अशा स्वरूपाचे हे पहिले इमर्सिव्ह आयव्हीएफ नॉलेज सेंटर असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले. इंटरॲक्टिव्ह आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या माध्यमातून रुग्णांना प्रजनन क्षमता, आयव्हीएफ उपचार आणि पुनरुत्पादक आरोग्याविषयी माहिती समजून घेता यावी, यासाठी या केंद्राची रचना करण्यात आली आहे.

केंद्रामध्ये इनविट्रोफर्टिलायझेशन (आयव्हीएफ), इंट्रासाइटोप्लाज्मिक स्पर्म इंजेक्शन (आयसीएसआय), इंट्रासाइटोप्लाज्मिक मॉर्फोलॉजिकली सिलेक्टेड स्पर्म इंजेक्शन (आयएमएसआय), प्रीइम्प्लांटेशन जेनेटिक टेस्टिंग (पीजीटी/पीजीडी), लेसर असिस्टेड हॅचिंग, प्रगत भ्रूण संवर्धन आणि क्रायोप्रिझर्व्हेशन यांसह सहाय्यक पुनरुत्पादक तंत्रज्ञानाच्या विविध सुविधा उपलब्ध आहेत.

यावेळी डॉ. गौतम दफ्तरी म्हणाले की, पनवेलमध्ये विस्तार करणे म्हणजे नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील कुटुंबांना उच्च दर्जाची प्रजनन सेवा अधिक सुलभ करून देणे होय. सल्लामसलत, निदान, भ्रूणविज्ञान, उपचार आणि रुग्ण शिक्षण एकाच छताखाली आणण्यात आले आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि क्लिनिकल प्रणालीच्या माध्यमातून सातत्यपूर्ण, पारदर्शक आणि रुग्णकेंद्रित प्रजनन आरोग्यसेवा देण्यावर भर आहे.

# वडाळे तलावाजवळ दुचाकीस्वारांची मनमानी



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेलमधील ऐतिहासिक वडाळे तलाव परिसरात दुचाकीस्वारांच्या वाढत्या धुमाकूळामुळे स्थानिक व ज्येष्ठ नागरिक, तसेच संध्याकाळी फिरायला येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून या तलावाचे सुशोभीकरण केले असून, हे ठिकाण पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनले आहे. मात्र, काही बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे या परिसरातील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे. तरुण दुचाकीस्वार तलावाच्या बाजूच्या रस्त्यांवर सुसाट वेगाने गाड्या चालवतात आणि धोकादायक स्टंट्स करतात. त्यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे. गाड्यांचे सायलेन्सर बदलून मोठ्या आवाजात फटाके फोडल्यासारखा आवाज करत गाड्या फिरवल्या जातात. त्यामुळे परिसरात तीव्र ध्वनी प्रदूषण निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी उपलब्ध आहेत. याठिकाणी उद्भवणाऱ्या तक्रारीनंतर अनेकदा स्थानिक पोलिसांसह प्रादेशिक परिवहन विभागाने देखील कारवाईचा बडगा उगारला आहे. यावेळी विनाहेल्मेट मोटरसायकल चालविणे, मोटरसायकलवर ट्रिपल सीट किंवा चारसीट प्रवास करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मोटरसायकलवरून फिरणाऱ्या तरुणांवर वाहतूक शाखेच्या पथकाने नियमानुसार कारवाई केली. कारवाईदरम्यान संबंधित मोटरसायकल चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले.

# 'टोरंट'ची माहिती सार्वजनिक करा

- पर्यावरण बचाव समितीची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात होऊ घातलेल्या प्रस्तावित टोरेंट प्रकल्पाची संपूर्ण कागदपत्रे व ब्ल्यू प्रिंट सार्वजनिक करा, अशी मागणी पर्यावरण बचाव समितीने केली आहे. शेतकऱ्यांसाठी ही माहिती सार्वजनिक होणे गरजेचे असून, ब्ल्यू प्रिंट जाहीर केली जात नाही तोवर शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीबाबत घाईने निर्णय घेऊ नये, असे आवाहन केले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी आपल्या मालकीच्या जमिनी, गुरचरण, गावठाण, आदिवासी जमिनीचा वापर टोरेंट कंपनीला देऊ नये, असे आवाहनदेखील केले आहे.

टोरेंट पॉवर एनर्जी स्टोरेज सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडकडून प्रस्तावित प्रकल्पासाठी भालीवाडी, पोटल, आंबोट, सायडोंगर व पाली परिसरातील जमीन आणि मिसिंग लिंक रस्त्याचा विषय सध्या चर्चेत आहे. मात्र, प्रकल्पाचा नेमका आराखडा, जमीन संपादन आणि पर्यावरणीय परिणाम याबाबत शेतकऱ्यांना संपूर्ण व अधिकृत माहिती मिळणे आवश्यक आहे, अशी सूचना पर्यावरण बचाव समितीने केली आहे.

टोरेंट आणि संबंधित प्रशासनाने सार्वजनिक करावी, असे आता शेतकरी जाहीरपणे बोलत आहेत. मिसिंग लिंक रस्त्याचा अंतिम नकाशा तसेच मार्ग, लांबी, रुंदी, वळणे, उतार आणि प्रभावित सर्व्हे नंबर जाहीर करण्याची मागणी केली. जमीन संपादनाची कायदेशीर प्रक्रिया जाहीर करावी आणि भूसंपादन कायदे, हरकती, सुनावणी, मोबदला व इतर प्रक्रिया स्पष्ट करावी. वनजमीन वापरण्याचा प्रस्ताव असल्यास, त्यासाठी आवश्यक वनमंजुरीची सद्यःस्थिती जाहीर करावी. तीन सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या जनसुनावणीचा अहवाल व त्यानंतरची कार्यवाही जनतेसमोर ठेवावी. ट्रान्समिशन मार्गिका यांची लेआउट सार्वजनिक करावा. प्रस्तावित दोन्ही धरणे आणि/जलाशयांचा आराखडा, क्षमता, बाधित क्षेत्र व गावांची माहिती स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे.

वनक्षेत्र,खासगी जमीन, गुरचरण, गावठाण आणि शेतीवर होणारा संभाव्य परिणाम लक्षात घेता प्रकल्पाचा संपूर्ण नकाशा आणि अधिकृत कागदपत्रे शेतकरी व नागरिकांसमोर असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीवर परिणाम होणार असेल तर त्यांना पूर्ण माहिती मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना आवाहन करून टोरेंट प्रकल्पाची संपूर्ण कागदपत्रे, नकाशे, मंजुरी व कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट होईपर्यंत आपल्या जमिनीबाबत कोणताही निर्णय घाईने घेऊ नका, असे आवाहन केले आहे. त्यासाठी शेतकऱ्यांवर कोणत्याही दबावाला किंवा अपूर्ण माहितीवर आधारित चर्चेला बळी पडू नका. प्रत्येक नोटीस, मोजणी किंवा प्रस्तावाची कायदेशीर माहिती शेतकऱ्यांना घ्यावी अशी सूचना केली आहे.

# ६० हजारांचे बैल चोरीला

**माणगाव** : बोर्ले बौद्धवाडी परिसरातील माळरानावरून ६० हजार रुपये किमतीचे दोन गावठी बैल अज्ञात चोरट्याने चोरी करून नेल्याची घटना १० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादीचे दोन बैल बोर्ले बौद्धवाडी येथील माळरानावर असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या संमतीशिवाय व स्वतःच्या फायद्यासाठी ते चोरून नेले. बैल चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर माणगाव पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक चिकणे तपास करीत आहेत.

# मॉडेलच्या मृत्यूप्रकरणी प्रियकरावर गुन्हा

| पनवेल | प्रतिनिधी |

मॉडेलिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या २६ वर्षीय कंचन कश्यप हिच्या मृत्यूप्रकरणाला काही महिन्यांनंतर नवे वळण मिळाले आहे. कंचनच्या मोबाईलमधील व्हॉट्सॲप चॅट्स, विवाह प्रमाणपत्र तसेच अन्य कागदपत्रांच्या आधारे तिच्या वैवाहिक आयुष्यात कथित छळ झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी कंचनच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलिसांनी जितेश कदम याच्याविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मूळची दिल्ली येथील रहिवासी असलेली कंचन सुमारे पाच वर्षांपूर्वी मुंबईत आली होती. मॉडेलिंग क्षेत्रात काम करत असताना तिची जितेश कदम याच्याशी ओळख झाली. पुढे दोघांमध्ये जवळीक निर्माण झाली होती.

कंचनच्या मृत्यूनंतर तिच्या मोबाईलमधील व्हॉट्सॲप संभाषण, विवाह प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांची माहिती कुटुंबीयांच्या निदर्शनास आली. या माहितीच्या आधारे तिच्यावर वैवाहिक आयुष्यात मानसिक व अन्य प्रकारचा छळ झाल्याचा आरोप तिच्या आईने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे.

तक्रारीची दखल घेत पनवेल शहर पोलिसांनी जितेश कदम याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. मृत्यूच्या नेमक्या कारणासह तक्रारीतील आरोपांची पोलिसांकडून पडताळणी केली जात आहे.

# पान १ वरुन

## पडीक जमिनी होणार शासनजमा!

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांतर्गत ही कारवाई करण्यात येत आहे. संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींना आवश्यक कागदपत्रांसह अप्पर जिल्हाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. गुरुवारी (दि.१७) पर्यंत सुनावण्या पुर्ण झाल्याची माहिती अपर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली. त्यामुळे आता या जमिनी लवकर शासन जमा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. रायगड जिल्ह्याची ओळख पर्यटनाबरोबरच औद्योगिक जिल्हा म्हणूनही आहे. जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक प्रकल्प आहेत. वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबरच जिल्ह्यात नागरिकीकरणाचा वेगही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. औद्योगिक प्रकल्पांच्या नावाखाली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जमिनी संपादित करण्यात आल्या असून, काही ठिकाणी अद्यापही जमीन संपादनाच्या हालचाली सुरू आहेत.

मात्र, प्रकल्पासाठी जमीन संपादित करून घेतल्यानंतर अनेक ठिकाणी त्यावर प्रत्यक्ष उद्योग उभारण्यात आलेला नाही. परिणामी, या जमिनी वर्षानुवर्षे वापराविना पडून राहिल्या आहेत. काही जमिनी नापिक झाल्याने त्याचा परिणाम शेतीच्या क्षेत्रावरही झाला आहे. उद्योगासाठी जमीन गेली; मात्र उद्योगही आला नाही आणि जमीन शेतीतही राहिली नाही, अशी स्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाली आहे.

४जिल्हा प्रशासनाने संबंधित २११ कंपन्यांना नोटिसा बजावल्या असून, यामध्ये रोहा, खालापूर, पेण आणि पोलादपूर तालुक्यांतील कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आवश्यक कागदपत्रांसह अप्पर जिल्हाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले होते. गुरुवारी(दि. १७)पर्यंत सुनावणी पुर्ण झाली आहे. कंपन्यांकडील जमीन नेमकी कोणत्या कारणासाठी संपादित करण्यात आली, त्या जमिनीवर प्रकल्प उभारण्यात आला आहे की नाही, जमीन किती काळ वापराविना आहे आणि संबंधित प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे, याची चौकशी व कागदपत्रांची पडताळणी जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली.

## म्हसळा पुन्हा हादरलं!

यापूर्वीही २३ ऑगस्ट रोजी अनुसूचित जातीतील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना समोर आली होती. त्यामुळे अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. म्हसळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, या प्रकरणातील पाच आरोपींपैकी दोन आरोपी अल्पवयीन असल्याचे समजते. प्रकरणाचा पुढील तपास म्हसळा पोलीस करत आहेत. पोलीस उपअधीक्षक तसेच म्हसळा पोलीस ठाण्याचे अधिकारी राजेंद्र जाधव आणि सपोनि चव्हाण या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत.

## सात तालुक्यांना डेंग्यूचा धोका

काँक्रिटीकरण झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या काँक्रिटीकरणामुळे पाण्याचा निचरा होण्याचा मार्गच बंद झाला आहे. अनेक घराच्या बाजूला अथवा मागील बाजूला सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले जाते. जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून कधी ऊन, कधी पाऊस असे वातावरण निर्माण झाले आहे. या पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचून राहात आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भावदेखील वाढू लागला आहे.

जिल्ह्यातील पनवेल, अलिबागबरोबरच आता पेण, रोहा, महाड अशा अनेक तालुक्यांत डेंग्यूचे रुग्ण सापडत आहेत. तापाची साथ ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी होत आहे. ताप येत असल्याने अनेकजण खासगी दवाखान्यात जाऊन उपचार घेत आहेत. तरीदेखील अनेकजण बरे होत नाही. त्यामुळे हिवताप विभागामार्फत रक्ताचे नमुने घेऊन तपासणी केली जात आहे. जिल्ह्यामध्ये जानेवारी ते १६ सप्टेंबर या साडेआठ महिन्यांच्या कालावधीत साडेचार हजारांहून अधिक जणांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली आहे. या तपासणीमध्ये ४१५ जणांना डेंग्यू झाल्याचे आढळून आले. जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत डेंग्यूचे ३७१ रुग्ण सापडले आहेत. १६ सप्टेंबरपर्यंत ४४ रुग्ण सापडले आहेत. यामध्ये आतापर्यंत पनवेल शहरी भागातील २८८ जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १२७ रुग्णांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात १९ अलिबागमध्ये १९, मुरूड, महाडमध्ये प्रत्येकी दोन, माणगाव, पेण व रोहामध्ये प्रत्येकी एक असे रुग्ण सापडले आहेत. चारशेपार सापडलेल्या रुग्णांवर जिल्हा सामान्य रुग्णालयांसह अन्य सरकारी दवाखान्यांमध्ये उपचार करण्यात आले आहेत. काहीजण उपचार करून बरे झाले आहेत, तर काही जणांवर उपचार सुरु असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

जिल्ह्यात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याने आरोग्य विभागाचीदेखील धावाधाव सुरु झाली आहे. ज्या ठिकाणी रुग्ण सापडत आहेत, त्याठिकाणी यंत्रणेद्वारे तपासणी करून परिसरात कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन केले जात आहे. गावागावात जनजागृती केले जात आहे. इतक्या उपाययोजना करूनदेखील शहराबरोबरच आता डेंग्यूने ग्रामीण भागातदेखील शिरकाव केला आहे.

**शहरातील नागरिकांमुळे गावात डेंग्यू**

डेंग्यू संसर्गजन्य आजार आहे. रायगड जिल्हयामध्ये पनवेल शहरात डेंग्यूचे रुग्ण अधिक सापडले आहेत. सध्या गणेशोत्सवाचा हंगाम सुरु आहे. नागरिकांची गावाकडे येणाऱ्यांची वर्दळ वाढली आहे. शहरी भागातील नागरिक गावी आले आहेत.त्यामुळे शहराबरोबरच ग्रामीण भागातदेखील तापाचे रुग्ण वाढण्याची भिती जिल्हा हिवताप विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळेन नागरिकांनी तापस आल्यास तात्काळ उपचार करावा, असे आवाहन जिल्हा हिवताप कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## कामोठेच्या सांडपाणी केंद्रासाठी ३५ कोटींची निविदा

राहणार आहे. यामुळे दुरुस्तीनंतर यंत्रणेची नियमित देखभाल, आवश्यक दुरुस्ती आणि केंद्राचे कामकाज सुरळीत ठेवण्यावर भर राहणार आहे.

८५ एमएलडी क्षमतेचे हे केंद्र कामोठे परिसरातील सांडपाणी प्रक्रियेसाठी महत्त्वाचे आहे. प्रक्रिया केंद्राची यंत्रणा व्यवस्थित राहिल्यास सांडपाण्यावर योग्य पद्धतीने प्रक्रिया करण्यास मदत होणार आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सांडपाणी व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी अशा सुविधांचे बळकटीकरण आवश्यक आहे.

आता ३५ कोटी २० लाख रुपयांच्या या कामासाठी कोणती कंपनी पात्र ठरते, प्रत्यक्ष निविदा किती रकमेची मंजूर होते आणि नूतनीकरणानंतर केंद्राच्या कामकाजात नेमके कोणते बदल होतात, याकडे लक्ष लागले आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

## मुंबई-गोवा महामार्ग खर्चाने फुगला!

व्हिसलब्लोअर्स फाउंडेशन'चे आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जावर रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या उत्तरातून खर्चवाढीची ही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्रातील एनएच-६६ च्या ३५५ किलोमीटरच्या चौपदरीकरणासाठी असलेल्या दहा पॅकेजची मंजूर किंमत ११ हजार ४०९.१४ कोटींवरून १६ हजार ९०९.२२ कोटी रुपये झाली आहे. आतापर्यंत ११ हजार ५७७ कोटी रुपये खर्च झाले आहेत. विशेष म्हणजे, एवढा मोठा निधी खर्च झाल्यानंतरही महामार्गाचे मोठे भाग अद्याप अपूर्ण असल्याचे आरटीआयमधून समोर आले आहे. म्हणजेच, पैशांचा ओघ सुरू आहे; खर्चाचा आकडा वाढतोय; मात्र काम पूर्ण होण्याचा ठोस पत्ता नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

## शिंदेंच्या हेलिकॉप्टरचे महाडमध्ये लँडिंग

हवामानामुळे पुढील हवाई प्रवास करणे सुरक्षित नसल्याने पायलटने खबरदारीचा निर्णय घेत हेलिकॉप्टर महाड येथे उतरवले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर महाडमध्ये उतरताच ही माहिती शिवसैनिकांना मिळाली त्यांनी गर्दी केली होती. दरम्यान, खराब हवामानामुळे हेलिकॉप्टरचा प्रवास थांबवून रस्तेमार्गे दरे गावाकडे करण्यात आलेल्या या दौऱ्यामुळे महाडमध्ये काही काळ राजकीय आणि प्रशासकीय हालचालींना वेग आला होता.

## महिलांना मिळणार शेतकरी म्हणून अधिकृत ओळख

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे. पात्र महिलांना या माध्यमातून अर्ज करून प्रमाणपत्र मिळवता येणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी पात्र महिलांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

# १९ टन माल घेऊन ट्रक बेपत्ता

| खालापूर | प्रतिनिधी |

इसांबे फाटा येथून बंगळुरूला पाठविण्यात आलेला माल घेऊन निघालेली १९ टन क्षमतेची ट्रक इच्छित स्थळी न पोहोचल्याने मालाचा अपहार केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात खालापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ ऑगस्ट ते १६ सप्टेंबरदरम्यान हा प्रकार उघडकीस आला.

फिर्यादीने टाटा स्टील कंपनीकडून चिक्कापूर, बंगळुरू येथे माल पोहोचविण्यासाठी वाहनाची मागणी केली होती. त्यानुसार श्री समर्थ रोड लाईन ट्रान्सपोर्टमार्फत आरजे-११-जीबी-८९७६ क्रमांकाची गाडी उपलब्ध करून देण्यात आली. माल लोड झाल्यानंतर ही गाडी १६ किंवा १७ ऑगस्ट रोजी चिक्कापूर येथे पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, गाडी व माल इच्छितस्थळी पोहोचला नाही. तसेच गाडी मालक व चालकाचे मोबाईल बंद असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव तपास करीत आहेत. या चोरीचा तपास लवकर लावावा, अशी मागणी होत आहे.

# घराचा दरवाजा तोडून भांड्यांची चोरी

**महाड** : करंजाडी येथील बंद घराचा दरवाजा, कडी-कोयंडा आणि बिजागरी तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत ३ हजार ५०० रुपये किमतीची भांडी चोरी करून नेल्याची घटना १५ ऑगस्ट ते १३ सप्टेंबरदरम्यान घडली. फिर्यादीच्या आईचे करंजाडी येथे घर असून त्या तळा येथे राहण्यासाठी गेल्या असताना अज्ञात चोरट्याने घराला लक्ष्य केले. घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश करत घरातील भांडी चोरीला नेण्यात आली. याप्रकरणी महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नियमभंग करणाऱ्या ६३ जणांवर कारवाई

**अलिबाग** : वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात जिल्ह्यातील वाहतूक शाखेने कारवाई केली. १६ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या अखत्यारीत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण ६३ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

वाहतुकीचे विविध नियम मोडल्याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करून त्यांच्याकडून एकूण ५५ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**"जाहिर नोटीस"**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-सहाण, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालक ध्रुव दयानंद कवळे यांचेकडुन आमचे आशिलांनी बिनशेती जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) बिनशेती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे.सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड | २९९/६ | क्षेत्र ३.४३.०० आर.चौ.मी. | ३४.३० |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १९/०९/२०२६

सही /-
**ॲड. सौ.गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदक हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

# पालीत भटक्या कुत्र्यांची दहशत



■ १० वर्षांच्या चिमुरडीसह भाविक महिलेवर हल्ला
■ नगरपंचायतीच्या कारभारावर नागरिकांचा संताप

| पाली | प्रतिनिधी |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात सध्या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव पराकोटीला पोहोचला असून नागरिक आणि भाविकांमध्ये कमालीचे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवारी (दि. १५) तहसील कार्यालयासमोरील चौधरी यांच्या गोडाऊनजवळ १० वर्षांची चिमुरडी अक्षरा कंक हिच्यावर भटक्या कुत्र्यांच्या टोळीने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात कुत्र्यांनी तिच्या पोटावर, मांडीवर आणि हातावर गंभीर चावा घेतला. सुदैवाने, जवळच काम करणाऱ्या एका महिला आणि तरुणाने तातडीने धाव घेत कुत्र्यांना पिटाळून लावल्याने मोठा अनर्थ टळला. हा संपूर्ण थरार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. अक्षरावर अलिबाग येथील शासकीय रुग्णालयात उपचार करून तिला घरी सोडण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर आहे.

या घटनेच्या अवघ्या दोन दिवसांपूर्वी बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी ठाण्यावरून आलेल्या एका महिला भाविकाला पार्किंगच्या ठिकाणी कुत्र्याने चावा घेऊन जखमी केले. याशिवाय, हे भटके कुत्रे उभ्या असलेल्या अवजड वाहनांखाली आश्रय घेऊन गाड्यांच्या वायरी व तांत्रिक भाग तोडून नुकसान करत आहेत. यामुळे आतापर्यंत २५ ते ३० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती स्थानिक नागरिक विक्रांत चौधरी यांनी दिली.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पाली नगरपंचायतीने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शहरातील ज्या भागांत मोकाट कुत्र्यांचा वावर अधिक आहे. ठिकठिकाणी टोळक्याने राहणारे हे कुत्रे लहान मुले, नागरिक आणि दुचाकीस्वारांवर दबा धरून हल्ला करत असल्याने नगरपंचायतीने यांचा तातडीने कायमचा बंदोबस्त करावा, अशी तीव्र मागणी संतप्त ग्रामस्थांकडून होत आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पाली नगरपंचायतीने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शहरातील ज्या भागांत मोकाट कुत्र्यांचा वावर अधिक आहे, त्या ठिकाणांची पाहणी करून संबंधित यंत्रणेमार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

लहान मुलांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पाली नगरपंचायतीने या गंभीर घटनेची तात्काळ दखल घेऊन मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर ठोस आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

सुधागडचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी सांगितले की, तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये रेबीजविरोधी लशीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. कुत्रा चावल्यास नागरिकांनी त्वरित उपचार घ्यावेत असे आवाहन केले आहे.

> हॅपी अम्ब्रेला संस्थेमार्फत यापूर्वी काही कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण झाले असून उर्वरित कुत्र्यांसाठी ही प्रक्रिया पुन्हा राबवली जाईल. तसेच शहरात कुत्र्यांसाठी मशेल्टरफ उभे करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे.
> – पराग मेहता,
> नगराध्यक्ष पाली नगरपंचायत

## रोह्यात मोकाट कुत्र्यांची धडपकड



| रोहा | प्रतिनिधी |

रोहा शहरात सद्या मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातले असून मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात अनेक जण जखमी झाले आहेत.या भटक्या कुत्र्यांविषयी उपाय योजना करावी अशी मागणी जनतेतून होत असताना आज नगर पालिकेने या मोकाट कुत्र्यांची धडपकड मोहीम सुरू केल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

रोहा शहर व ग्रामीण भागातील अनेक गावात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात शेकडो जण जखमी झाले आहेत. या भटक्या कुत्र्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने नागरिकांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. गणेशोत्सवात चाकरमानी आपल्या गावी येत असल्याने सणासुदीत कुत्र्यांच्या हल्ल्यांचे घटना घडू नये म्हणून नगर पालिका प्रशासनाने तातडीने या संदर्भात उपाय योजना करावी अशी मागणी जनते कडून होताच नगराध्यक्षा वनश्री शेडगे, मुख्याधिकारी अजय कुमार एडके, अहमद दर्जी व सर्व सभापती यांच्या प्रयत्नाने रोहा नगर पालिका हद्दीत शुक्रवारी भटक्या कुत्र्यांची धडपकड मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेत अनेक भटक्या कुत्र्यांची धडपकड करून त्यांच्यावर निर्भिजीकरण व लसीकरण करण्यात अशी माहिती नगर पालिका प्रशासना कडून देण्यात आली.

## पराडे येथे कारची दुचाकीला धडक

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पराडे कॉर्नर येथे एका कारचालकाने दुचाकीला धडक देऊन अपघात केल्याची घटना घडली. या अपघातात चार जण जखमी झाले असून, दुचाकीचेही नुकसान झाले आहे. या अपघातानंतर संबंधित कारचालकाने घटनास्थळावरून पलायन केले. यावेळी सफेद रंगाच्या कारचालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने दुचाकीला धडक देऊन अपघात केला. या अपघातात दुचाकीचालकाला किरकोळ दुखापत झाली असून, त्यांची पत्नी अक्षता मुंढे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. तसेच सहा वर्षांची मुलगी मायली एक वर्षाचा मुलगा स्मरणला दुखापत झाली आहे. या अपघातानंतर कारचालकाने जखमींना मदत न करता घटनास्थळावरून कारसह पलायन केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास अधिक पोलीस हवालदार पानपाटील करीत आहेत.

## निवडक

### महिलेच्या हत्याप्रकरणी दोघांना अटक

**नवीन पनवेल :** गव्हाण फाटा येथे महिलेची हत्या करून तिचा मृतदेह अपूर्ण खड्ड्यात पुरून ठेवल्या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी सुशील हिरेन आणि त्याचा मित्र रमेश तमस एक्का या दोघांना अटक केली. गव्हाण फाटा येथील वाहतूक पोलीस चौकीजवळ एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह नाल्यात पूरून ठेवल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या महिलेचा मृतदेह अपूर्ण खड्ड्यातून बाहेर काढून ताब्यात घेतला. तिच्या पतीनेच मित्राच्या मदतीने तिची हत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले. पती सुशील हिरेन (राहणार गव्हाण फाटा ट्राफिक ऑफिस समोरील ब्रिज खाली, मुळगाव झारखंड, व्यवसाय भंगार गोळा करणे) याने त्याचा मित्र रमेश तमस एक्का याच्या मदतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन लाथाबुक्याने मारहाण करून तिच्या हत्या केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### खारघरमधून तरुण बेपत्ता

**पनवेल :** खारघर सेक्टर ११ येथून ३१ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. संदीप लक्ष्मण इंगळे असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. तो 'गावी जातो' असे सांगून राहत्या ठिकाणाहून निघून गेला. मात्र, त्यानंतर तो अद्याप घरी परतलेला नाही. त्याची उंची सुमारे ५ फूट ५ इंच असून, शरीरयष्टी मजबूत, रंग सावळा, केस मध्यम काळे, डोळे काळे असून चेहरा गोल आहे. घरातून निघताना त्याने निळ्या रंगाचा शर्ट, काळ्या रेघा असलेली पांढऱ्या रंगाची पॅन्ट परिधान केली होती. तसेच, त्याच्या पाठीवर काळ्या रंगाची सॅक होती. बेपत्ता तरुणाबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास तातडीने खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### माहेरवाशीण गौरीचा पाहुणचार

**खांदा कॉलनी :** गुरुवारच्या पूर्वसंध्येला मोठ्या उत्साहात गौरीचे आगमन झाल्यानंतर शुक्रवारी सकाळपासूनच घराघरांत तिच्या पाहुणचाराची लगबग सुरू झाली. माहेरवाशीण लेक घरी आल्यानंतर ज्या प्रेमाने तिचे लाड केले जातात, त्याच भावनेने महिलांनी गौरीचा पाहुणचार केला.गौरीसमोर आकर्षक आरास करून फुलांनी सजावट करण्यात आली.



सकाळी लवकर उठून महिलांनी घराची स्वच्छता करून गौरीची मनोभावे पूजा केली. गोडधोड पदार्थ, फळे आणि विविध पक्वान्नांचा नैवेद्य दाखवून गौरीकडे सुख-समृद्धी आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी प्रार्थना करण्यात आली. गौरीच्या पाहुणचारातील विशेष आकर्षण ठरतो तो ओवसा. पारंपरिक पद्धतीने ओवसा घेऊन महिला एकमेकींच्या घरी जात असल्याने परिसरातही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. साडी, दागिने आणि पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांमुळे सणाचे रंग अधिक खुलून दिसत आहेत.गौरी म्हणजे केवळ पूजा नव्हे, तर माहेरवाशीण लेकीच्या आगमनाचा आनंद असल्याची भावना महिलांमध्ये पाहायला मिळत आहे. तिच्यासाठी केलेला नैवेद्य, सजवलेले घर आणि भक्तीभावाने केलेली. यामुळे घराघरांत मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अभियानातून होणार त्रुटींची पूर्तता

## रायगड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा उपक्रम

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यामध्ये सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र तातडीने देण्यासाठी महिनाभर विशेष मोहिम असणार आहे. या मोहिमेची सुरुवात गुरुवारी (दि. १७) पासून सुरु केली आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात त्रुटींची पुर्तता १७ ऑक्टोबरपर्यंत होणार आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन त्रुटींची पूर्तता करून घ्यावी असे आवाहन उपायुक्त तथा समितीचे सदस्य जयंत चाचरकर यांनी केले आहे.

राज्यामध्ये १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानातून जिल्ह्यामध्ये वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत. सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हे अभियान हाती घेण्यात आले आहे. जिल्ह्यात जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या मार्फतही अभियान राबविले जाणार आहे. अकरावीतील (विज्ञान शाखा) प्रवेशित आणि, बारावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या २०२६ – २०२७ मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहिम असणार आहे. अनुसुचित जाती, एसईबीसी, इमाव तसेच इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांची प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात येणार आहेत. जात वैधता प्रमाणपत्रासाठी देण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी व त्रुटींची पुर्तता सकाळी दहा ते सायंकाळी सहा यावेळेत १७ ऑक्टोबरपर्यंत होणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तातडीने जात वैधता प्रमाणपत्र देण्याचा प्रयत्न जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून असणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या कार्यालयात येऊन त्रुटीची पुर्तता करून घ्यावी असे आवाहन जयंत चाचरकर यांनी केले आहे.

## सुरीचा धाक दाखवून तरुणाची लूट

| पनवेल | प्रतिनिधी |

सुरीचा धाक दाखवून तरुणाच्या गळ्यातील सुमारे १ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन चौघा लुटारूंनी जबरदस्तीने लुटून नेल्याची घटना नवी मुंबई विमानतळासमोरील उलवे-चिंचपाडा मार्गावर घडली. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञात चौघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार धीरज मुंडे (२४) हा पनवेल येथे राहतो. तो सीवूड्स येथील क्रोमा शोरूममध्ये काम करतो. कामावरून सुटल्यानंतर धीरज दुचाकीवरून विमानतळासमोरील रस्त्याने पनवेलकडे घरी जात होता. वाधिवली प्रवेशद्वाराजवळ मोटारसायकलवरून आलेल्या चौघांनी विमानतळाचा पत्ता विचारण्याच्या बहाण्याने धीरजला रस्त्यात अडवले. तो काही बोलण्यापूर्वीच त्यातील एका लुटारूने सुरीचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर चौघांनी धीरजच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची सुमारे १ लाख रुपये किमतीची सोन्याची चेन जबरदस्तीने काढून घेतली. लूट केल्यानंतर चौघेही दुचाकीवरून उलवेच्या दिशेने पसार झाले. या घटनेनंतर धीरज मुंडे याने विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



● मुरुड शहरात गौरी मातेचे पूजनाचा दिवस गुरुवारी साकारलेल्या गौरीमातेची विविध रुपे पहायला मिळत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## नांदगाव समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता

| आगरदांडा | प्रतिनिधी |

स्वच्छ सागर सुरक्षित सागर अंतर्गत प्राणी शास्त्र विभाग जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा जि.रायगड व ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव यांच्या तर्फे नांदगावच्या समुद्र किनाऱ्यांची सकाळी स्वच्छता करण्यात आली. समुद्र स्वच्छता आपली जबाबदारी, स्वच्छ किनारे, सुंदर पर्यावरण समृद्ध भविष्यासाठी समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता अत्यंत मोलाची आहे.या उद्दिष्टानुसार सदर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.




सदर मोहीमेत येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायतीचे आजी माजी सदस्य तथा कर्मचाऱ्यांनी, महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. समुद्रकिनारी पावसामुळे वाहून आलेला कचरा, प्लॅस्टिक पिशव्या, खाद्य पदार्थांची पाकिटे,बाटल्या व अन्य वस्तू गोळा करून सर्व कचरा पिशवीत जमा करण्यात येऊन त्याची विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आली. याप्रसंगी सेजल घुमकर, अस्लम हलडे, विक्रांत कुबल, नितेश रावजी, जितेंद्र दिवेकर, मंजुमअप्पा घोले, अनिल साखरकर, संजय ठाकूर, प्रतीक पेडणेकर, भारत चव्हाण, सागर राऊत, गणेश गाणार, मनिष चोरघे, महेश वाघमारे, केतन मोहिते आदी उपस्थित होते.

## उरणमध्ये अनधिकृत कमानींचा धुमाकूळ

| उरण | प्रतिनिधी |

गणरायाच्या आगमनाने उरण शहर भक्तीमय झाले असतानाच गणेशोत्सवाच्या नावाखाली रस्तोरस्ती उभारल्या जाणाऱ्या अनधिकृत कमानी आणि जाहिरातबाजीने प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राजकीय पुढारी, पदाधिकारी आणि व्यावसायिकांच्या जाहिरातींनी सजलेल्या या कमानी उभारताना पालिकेची परवानगी घेतली आहे का? त्याचे शुल्क पालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहे का? की गणेशोत्सवाच्या गर्दीत नियम आणि महसूल दोन्ही वाहून गेले आहेत, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.



उरण शहरातील विविध रस्त्यांवर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात कमानी उभारल्या जात आहेत. मात्र, या जाहिरातींसाठी आणि कमानींसाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, याची तपासणी पालिका प्रशासनाकडून होत आहे का, हा प्रश्न कायम आहे. उरणच्या रस्त्यांवर कमानी उभ्या राहतात, वाहतूक कोंडी होते, प्रशासन मात्र, बघ्याची भूमिका घेत असेल तर ही व्यवस्था नेमकी कोणासाठी? अशी संतप्त मागणी उरणकरांकडून होत आहे.

## अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**पनवेल :** करंजाडे येथील स्व. दि. बा. पाटील बालउद्यान परिसरात आढळून आलेल्या अनोळखी बेवारस इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याचे नातेवाईक किंवा ओळख पटविणाऱ्या व्यक्तींचा शोध पनवेल शहर पोलिसांकडून घेण्यात येत आहे. मृत इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे आहे. रंग गोरा, बांधा सडपातळ, उंची सुमारे ५ फूट ५ इंच असून चेहरा गोल आहे. डोक्याचे केस काळे-पांढरे असून दाढी व मिशीचे केस वाढलेले आहेत. सदर इसम १७ सप्टेंबर रोजी दुपारी १.२० वाजण्यापूर्वी करंजाडे, सेक्टर आर-०२ येथील बालउद्यान परिसरात आढळून आला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सपोनि सचिन पोवार करीत आहेत.




सार्वजनिक शिक्षणासाठी विद्यार्थी, पालकांचा सहभाग | माजी आ.बाळाराम पाटील उपस्थितांना करणार मार्गदर्शन

# पनवेलमध्ये 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' एल्गार

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

आजची 'जनरेशन अल्फा' ही उद्याची जबाबदार नागरिकांची पिढी आहे. देशाचे भवितव्य घडविणाऱ्या या पिढीला समान, गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशकशिक्षण मिळावे,यासाठी शिक्षण व्यवस्थेतील असमानता दूर करण्याची गरज व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेलमध्ये 'शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, २० सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत सेक्टर १३, खांदा कॉलनी येथील जनसेवा हॉलमध्ये ही परिषद होणार आहे. इंडियन ऑइल पेट्रोल पंपासमोर असलेल्या जनसेवा हॉलमध्ये होणाऱ्या या परिषदेत शिक्षण क्षेत्रातील वाढती असमानता, सर्वांसाठी समान शिक्षणाची उपलब्धता तसेच गुणवत्तापूर्ण सार्वजनिक शिक्षणाचा अधिकार या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

> **शिक्षणाचा अधिकारावर होणार चर्चा**
> क्षेत्रातील वाढती असमानता, सर्वांसाठी समान शिक्षणाची उपलब्धता तसेच गुणवत्तापूर्ण सार्वजनिक शिक्षणाचा अधिकार या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.



शिक्षण बचाव समन्वय समितीचे प्रतिनिधी रमेश बिजेकर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कोकण शिक्षक मतदारसंघाचे माजी विधानपरिषद सदस्य तथा शेतकरी कामगार पक्षाचे नेते बाळाराम दत्तात्रेय पाटील हेही उपस्थितांना संबोधित करणार आहेत.

शिवराज्य प्रतिष्ठान संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रोशन पाटील तसेच अनुभूती संस्थेच्या संस्थापक-निर्देशिका, लेखिका आणि 'पोलादी बाया' पुस्तकाच्या लेखिका दीपा पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सत्यशोधक विद्यार्थी संघटना, स्त्रीमुक्ती संघटना, भीमशक्ती युवा फोर्स, शिवराज्य प्रतिष्ठान संघटना, संविधानप्रेमी नागरिक, पनवेल (संविधान कट्टा), भीम युवा मित्र मंडळ, धम्मयान संस्था, ओपन एज्युकेशन, एकता सामाजिक संस्था, कामोठे, स्वामी विवेकानंद मानवसेवा बहुउद्देशीय संस्था, पनवेल तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ यांच्या सहभागातून या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे निमंत्रक मनोज तांडेल, महेंद्र नाईक, अनिता कोलते, विजय जाधव, सिद्धार्थ सूर्यवंशी, प्रविण जठार, अरविंद लोहार, बी. बी. भाकरे आणि तुषार सूर्यवंशी यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# प्रधानजींच्या राज्यात...

तमाशातला राजा विचारतो,प्रधानजी राज्याची हालहवाल कशी आहे. त्यावर आधी ती उत्तम आहे असे सांगून नंतर मग राज्यातला दुष्काळ, गुंडगिरी, भ्रष्टाचार, रोगराई कशी वाढली आहे याचे वर्णन प्रधान करतो. तमाशातला विनोद म्हणून लोक त्यावर हसतात. पण महाराष्ट्र नावाच्या राज्यात ही स्थिती प्रत्यक्ष आहे आणि ती अजिबात हसण्यासारखी नाही. किंबहुना, मुंबईजवळच्या मिरा भाईंदरमध्ये अलिकडेच जे काही घडले ते म्हणजे सध्याच्या भ्रष्टाचारी विद्रूप राज्याचे नमुनेदार उदाहरण आहे. मिरा-भाईंदरचे भाजपचे आमदार नरेंद्र मेहता यांच्या संदर्भातले हे प्रकरण आहे. तेथील एक नागरिक असगर अली वोरा यांनी १९८९ मध्ये भाईंदर पूर्वेच्या नवघर येथे सुमारे २८ गुंठ्यांचा एक भूखंड विकत घेतला होता. २०११ नंतर अचानक स्वयम डेव्हलपर्स आणि सेव्हन इलेव्हन कंपनीने त्यावर कबजा केला. या दोन्ही कंपन्या मेहता यांच्याशी संबंधित किंवा त्यांच्या मालकीच्या असल्याचे सांगितले जाते. याबाबत वोरा यांनी तक्रार केली. त्याबाबत चौकशी होऊन मूळ सातबारावरून बिल्डर कंपन्यांना नाव हटवून पुन्हा आपले नाव टाकण्यात आले. मात्र या भूखंडावर इमारती बांधण्याची सेव्हन इलेव्हन कंपनीला दिलेली महापालिकेने दिलेली परवानगी मागे घेतली नाही. यामुळे कागदावर काहीही असले तरी प्रत्यक्षात मेहता यांच्या कंपनीनेच हा भूखंड ताब्यात ठेवला असे वोरा यांचे म्हणणे होते. याबाबत महसूल खात्यात अपिले करूनही उपयोग न झाल्याने त्यांनी अखेर थेट पंतप्रधान मोदींचे दार ठोठावले. असगर अली हे ८१ वर्षांचे असून नरेंद्र मोदी यांच्यासोबत वडनगरच्या शाळेत ते एकत्र शिकले आहेत. म्हणजेच मोदींचे ते बालमित्र आहेत. याच नात्याने असगर अली यांनी आठ सप्टेंबरला मोदींची मुंबईत भेट घेतली. त्यानंतर लगेच चक्रे हलली. मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील सचिवांनी विशेष बैठक आयोजित केली. या बैठकीला वोरा, मेहता तसेच मिरा भाईंदरचे आयुक्त वगैरे हजर होते. तिथे या जमिनीवरचा हक्क सोडून देत असल्याचे मेहता यांनी जाहीर केले. महापालिकेनेही त्यांना दिलेली बांधकाम परवानगी बुधवारी रद्द केली.

## मिटवामिटवी की दडपादडपी

हे सगळे एखाद्या तमाशातल्या वगनाट्यातच शोभावे असे आहे. राजाचा बालमित्र त्याच्याकडे गाऱ्हाणे घेऊन येतो आणि राजा त्याला न्याय मिळवून देतो असा हा प्रकार झाला. पण म्हणजे, वोरा हे मोदींचे बालमित्र नसते तर असेच खितपत पडले असते असाही त्याचा अर्थ होतो. वोरा यांची बाजू बरोबर असावी म्हणूनच इतक्या तातडीने मंत्रालयात बैठक झाली व निर्णय झाला. अन्यथा, महसूलच्या प्रकरणांमध्ये यंत्रणा अजिबात स्वतःचे म्हणणे सोडत नाही हा सामान्यांचा अनुभव आहे. दरम्यान आपला आणि वोरा यांचा या प्रकरणात कोणताही व्यवहार झालेला नाही, आपण ही जमीन कोण्या मेर्विन फर्नांडिस यांच्याकडून खरेदी केली होती असे मेहता यांचे म्हणणे आहे. मात्र यामध्ये बऱ्याच कटकटी झाल्याने आपण स्वतःहून हा हक्क सोडून दिला असे मेहता आता सांगतात. बाजारभावाने या जमिनीची किंमत आज कित्येक कोटी रुपये आहे. त्यावरचा हक्क असा कोणीही सहजासहजी सोडून देईल यावर विश्वास बसण्यासारखे नाही. याचाच अर्थ या प्रकरणात बरेच पाणी मुरत आहे. मंत्रालयातील बैठकीत जे काही झाले ती तडजोड होती की मिटवामिटवी वा दडपादडपी होती याचा खुलासा व्हायला हवा. या जमिनीवरचा सातबारा वोरा यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या नावावर असेल तर पालिकेने बांधकाम परवानगी इतक्या दिवसात का मागे घेतली नव्हती हा कळीचा प्रश्न आहे. यामध्ये गुंतलेले अधिकारी तसेच कायदेभंग झाला असेल तर मेहता यांच्यावर कारवाई व्हायला हवी. पण तशी कोणतीही घोषणा बैठकीनंतर झालेली नाही. मेहता यांची बाजू चुकीची असेल तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई तर व्हायला हवीच पण भाजपने एक पक्ष म्हणूनही त्यांना जाब विचारलेला नाही. समजा वोरा यांची बाजू खोटी असूनही निव्वळ मोदींचे मित्र म्हणून त्यांना प्रशासनाने मदत केली असेल तर तेही अजब व आक्षेपार्ह आहे. अदानीचे प्रकल्प किंवा शक्तीपीठसारखे रस्ते यांच्यासाठीच्या जमिनी गेलेल्यांची आंदोलने आज रोजघडीला सर्रास चिरडली जातात. त्यांना मंत्रालय सोडा, तहसिल कचेरीतही उभे केले जात नाही. आणि वोरा हे मोदींचे मित्र म्हणून मात्र त्यांच्यावर खास मेहरबानी केली जाते हेच आजच्या प्रधानजीच्या राज्यातले कुशलमंगल आहे.

## भाजपने जबाब द्यायला हवा

वास्तविक या प्रकरणात नेमके काय घडले याचा खुलासा भाजपने करायला हवा. मेहता ज्या फर्नांडिस यांच्याकडून जमीन खरेदी केली म्हणतात ते कोण आहेत व त्यांचे नाव सातबारावर कसे आले याचा तपास व्हायला हवा. ज्या वोरांनी इतकी वर्षे मेहता यांना दाद दिली नाही त्यांचे एकाएकी मतपरिवर्तन कसे झाले हेही जनतेला कळायला हवे. शिवाय आज बांधकाम परवानगी परत गेली असली तरी वोरा यांना जमिनीचा ताबा कधी मिळतो तसेच भविष्यात वेगळ्या मार्गाने ही जमीन हडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना यावरही लक्ष ठेवायला हवे. या मेहतांच्या दांडगाईच्या अनेक कथा वारंवार प्रसिध्द होत असतात. त्यांच्याच पक्षाच्या गीता जैन किंवा त्यांचे मित्रपक्षातले म्हणजे शिंदेसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक हे सतत मेहता यांच्यावर भ्रष्टाचाराचे व गुंडगिरीचे आरोप करीत असतात. गेल्या निवडणुकीत मेहता यांना तिकिट मिळू नये म्हणून खूप मोठा दबाव खालच्या कार्यकर्त्यांचा होता. तरीही पक्षश्रेष्ठींनी मेहता यांच्या बाजूनेच कौल दिला व त्यांना वारंवार संरक्षण मिळत राहिलेले आहे. याचाच अर्थ मेहता पक्षाला फारच ही मौल्यवान गोष्टी पुरवत असले पाहिजेत. असले हे नामांकित नेते बहुदा त्यांच्या त्यांच्या भागातले बिल्डर असतात. त्याप्रमाणे मेहता यांच्याशी संबंधित कंपन्या मुख्यतः बांधकाम धंद्यात आहेत. मिरा भाईंदर हा मुंबई महानगरपालिकेत नसलेला पण मुंबईला अगदी लागून असलेला इलाका आहे. या विशिष्ट स्थानाचे दोन फायदे असतात. मुंबईत घर घेणे परवडत नाही असे अनेक मध्यमवर्गीय मिरा रोडकडे धाव घेतात. हा एक हुकुमी, होम लोन घेऊ शकणारा पगारदार ग्राहक बिल्डरांसाठी विशेष उपयुक्त असतो. त्यामुळे तेथे जागांचे दर गगनाला भिडलेले आहेत. याचा फायदा मेहता यांच्यासारख्यांच्या कंपन्या उठवत असतात. पुन्हा मिरा भाईंदर ही स्वतंत्र महापालिका असल्याने मुंबई पालिका किंवा पोलिसांचा अंमल तिथे चालू शकत नाही. मुंबईलगतच्या अशा भागांमध्ये तिथले राजकारणी नेते, बिल्डर, अधिकारी यांची युती होऊन प्रचंड भ्रष्टाचार व माफियागिरी झाल्याची उदाहरणे वारंवार दिसतात. वसईविरारचे हितेंद्र ठाकूर आणि उल्हासनगरचे पप्पू कलानी ही भूतकाळातील त्याची प्रकरणे होत. त्यावरून एकेकाळी गोपीनाथ मुंडे यांनी शरद पवार यांच्याविरुध्द काहूर माजवले होते. आज केंद्रातील नरेंद्र आणि राज्यातील देवेंद्रांची भाजप आणि त्यांची सरकारे मात्र मिरारोडचे नरेंद्र व त्यांच्यासारखेच असंख्य यांच्या प्रकरणांबाबत मूग गिळून गप्प आहेत. दुर्दैवाने, जनतेतही एकेकाळी ठाकूर-कलानीविरुध्द निर्माण झालेला संताप आज मेहता प्रकरणात दिसून येत नाही.

विचार

# अर्थव्यवस्थेची झेप; पुढची वाटचाल खडतर

***बाह्य धक्के वाढले, तेल महागले, तरी देशांतर्गत मागणी आणि गुंतवणुकीचा वेग कायम राहिला, तर भारताची आर्थिक कहाणी अधिक भक्कम होईल. अलिकडेच समोर आलेला भारताच्या जीडीपीचा ७.८ टक्के विकासदर हा केवळ एक आकडा नाही, तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या क्षमतेचा संकेत आहे; पण या क्षमतेचे सातत्यपूर्ण आणि सर्वसमावेशक विकासात रूपांतर करणे हेच आता धोरणकर्त्यांपुढील खरे आव्हान आहे.***



कैलास ठोळे

भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये अपेक्षेपेक्षा दमदार कामगिरी करत ७.८ टक्के सकल देशांतर्गत उत्पादनवाढ नोंदवली आहे. एप्रिल ते जून २०२६ या कालावधीतील ही वाढ मागील वर्षाच्या याच तिमाहीतील ६.९ टक्क्यांपेक्षा अधिक लक्षणीय आहे. विशेष म्हणजे पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या किमतीतील अस्थिरता, जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि भांडवली प्रवाहाबाबतची चिंता अशा प्रतिकूल वातावरणात भारतीय अर्थव्यवस्थेने दाखवलेला हा वेग निश्चितच आश्वासक आहे; मात्र या आकडेवारीकडे केवळ उत्सवाच्या दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. वाढीचा वेग गाठणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो टिकवणे कठीण असते. पहिल्या तिमाहीतील आकडेवारीचा सर्वात महत्त्वाचा संदेश असा आहे, की भारतीय अर्थव्यवस्थेची अंतर्गत ताकद वाढली आहे. सकल मूल्यवर्धनात ८.२ टक्क्यांची वाढ झाली आहे. उत्पादन, बांधकाम आणि सेवा क्षेत्रांनी या वाढीला भक्कम आधार दिला. उत्पादन क्षेत्राची वाढ ९.२ टक्क्यांवर पोहोचली असून, मागील वर्षी ती ८.३ टक्के होती. बांधकाम क्षेत्रानेही ७.७ टक्के वाढ नोंदवत मागील वर्षातील ५.२ टक्क्यांच्या तुलनेत मोठी झेप घेतली आहे. सेवा क्षेत्राने तर दहा टक्क्यांची वाढ नोंदवली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा आधार केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही, हे स्पष्ट होते. ही बाब विशेष महत्त्वाची आहे. कारण दीर्घकाळ टिकणारी आर्थिक वाढ ही उत्पादन, सेवा, पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि ग्राहक मागणी यांच्या परस्परपूरक विस्तारावर अवलंबून असते.

भारतात सेवा क्षेत्र आधीपासूनच अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार राहिला आहे. त्याला उत्पादन आणि बांधकामक्षेत्राची जोड मिळत असेल, तर रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि खासगी गुंतवणुकीला चालना मिळण्याची शक्यता वाढते. सरकारने उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना, पायाभूत सुविधांवरील खर्च आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या उपाययोजनांचे काही परिणाम या आकडेवारीत दिसत आहेत; परंतु या चांगल्या चित्रात एक महत्त्वाची चिंता दडली आहे. पहिल्या तिमाहीमध्ये कृषी आणि संलग्न क्षेत्रांची वाढ ३.६ टक्के राहिली, तर मागील वर्षी याच काळात ती ४.४ टक्के होती. मॉन्सूनचा असमतोल किंवा अपेक्षेपेक्षा कमी पाऊस राहिल्यास कृषी उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकूण आकारात कृषी क्षेत्राचा वाटा पूर्वीपेक्षा कमी असला, तरी देशातील मोठ्या लोकसंख्येच्या उत्पन्नाशी त्याचा थेट संबंध आहे. त्यामुळे कृषीक्षेत्रातील कमकुवत कामगिरीचा परिणाम ग्रामीण मागणीवर होतो आणि त्यातून अखेरीस उद्योग आणि सेवा क्षेत्रांवरही दबाव निर्माण होऊ शकतो. याच संदर्भात खासगी अंतिम उपभोग खर्चाची ७.१ टक्के वाढही तपासणे आवश्यक आहे. ही वाढ समाधानकारक असली, तरी एकूण जीडीपीवाढीपेक्षा कमी आहे. म्हणजेच अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता आणि गुंतवणूक वेगाने वाढत असताना ग्राहक मागणी त्याच प्रमाणात पुढे जात आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो.

आर्थिक वाढीचा लाभ व्यापक समाजापर्यंत पोहोचण्यासाठी ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांमधील उपभोग मागणी मजबूत असणे गरजेचे आहे. रोजगाराच्या संधी, प्रत्यक्ष उत्पन्नातील वाढ आणि महागाईवरील नियंत्रण या तीन घटकांवर ग्राहकांचा आत्मविश्वास अवलंबून असतो. या पार्श्वभूमीवर गुंतवणुकीच्या आकडेवारीकडे आशावादाने पाहता येते. स्थिर भांडवल निर्मितीत ११.९ टक्क्यांची वाढ झाली असून मागील वर्षी ती केवळ ५.८ टक्के होती. सध्याच्या किमतींवर जीडीपीतील भांडवल निर्मितीचा वाटा ३४.३ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. हा बदल अर्थव्यवस्थेच्या भविष्यासाठी महत्त्वाचा आहे. कारण गुंतवणूक म्हणजे केवळ आजची मागणी नव्हे, तर ती उद्याची उत्पादनक्षमता निर्माण करते. नवीन कारखाने, रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा प्रकल्प, डिजिटल पायाभूत सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानातील गुंतवणूक वाढल्यास अर्थव्यवस्थेची संभाव्य वाढही वाढते; मात्र गुंतवणुकीची आकडेवारी वाढली म्हणजे समस्या संपल्या असे मानणे धोकादायक ठरेल. ही गुंतवणूक सरकारी क्षेत्रापुरती मर्यादित आहे की खासगी क्षेत्रही मोठ्या प्रमाणावर पुढे येत आहे, हे पहावे लागेल. सरकारी भांडवली खर्चाने गेल्या काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेला मोठा आधार दिला आहे; पण कायमस्वरूपी उच्च वाढीसाठी खासगी क्षेत्राच्या गुंतवणुकीचा वेग वाढणे अपरिहार्य आहे. सरकारकडे वित्तीय संसाधने मर्यादित आहेत. त्यामुळे प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सरकारी निधीवर अवलंबून राहणे दीर्घकाळ शक्य नाही. आर्थिक वाढीच्या या चांगल्या आकडेवारीमागे धोरणात्मक हस्तक्षेपांचाही वाटा आहे. प्रत्यक्ष करातील सवलती, जीएसटीतील बदल, अनुकूल पतधोरण आणि सार्वजनिक भांडवली खर्च यामुळे मागणी आणि गुंतवणुकीला चालना मिळाली; मात्र कोणत्याही प्रोत्साहनाचा परिणाम कायम स्वरूपी नसतो. करसवलत किंवा करकपातीमुळे एका टप्प्यावर ग्राहकांची खर्च करण्याची क्षमता वाढते; पण त्यानंतर ती वाढ टिकवण्यासाठी रोजगार आणि उत्पन्न वाढणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे कमी व्याजदर गुंतवणुकीला चालना देऊ शकतात; परंतु गुंतवणुकीची मागणी, बाजारपेठेवरील विश्वास आणि भविष्यातील नफ्याची अपेक्षा मजबूत नसेल तर केवळ स्वस्त कर्ज पुरेसे ठरत नाही. आता अर्थव्यवस्थेसमोर सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे ते महागाई आणि वाढ यांच्यातील संतुलनाचे. आर्थिक वाढ वेगाने होत असताना मागणी वाढू शकते. त्याच वेळी कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या किंवा पुरवठा साखळ्यांवर दबाव आला, तर महागाई वाढण्याचा धोका निर्माण होतो. भारताच्या ऊर्जा गरजांमध्ये आयातीत तेलाचे महत्त्व मोठे असल्याने पश्चिम आशियातील संघर्ष भारतासाठी केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय राहत नाही, तो थेट अर्थव्यवस्थेच्या खर्चरचनेशी जोडला जातो. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की वाहतूक, उत्पादन, वीज, रसायने, खत आणि विविध वस्तूंच्या किंमतींवर परिणाम होतो. त्यातून ग्राहकांच्या खिशावर भार वाढतो आणि सरकारच्या अनुदानाच्या खर्चावरही दबाव येतो. खत अनुदान वाढल्यास केंद्राच्या वित्तीय तुटीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सरकारसमोर एकाच वेळी अनेक आघाड्यांवर संतुलन साधण्याचे आव्हान आहे. याच ठिकाणी केंद्रीय अर्थसंकल्पातील भांडवली खर्चाचे महत्त्व अधोरेखित होते.

वित्तीय तूट नियंत्रित ठेवताना पायाभूत सुविधांवरील खर्च कमी होऊ न देणे ही सोपी कसरत नाही. महसुली खर्च वाढला आणि अनुदानांचा भार वाढला, तर विकासात्मक खर्चासाठी उपलब्ध संसाधने कमी होण्याची शक्यता असते. म्हणूनच सरकारने खर्चाची गुणवत्ता वाढवणे, अनुत्पादक खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि भांडवली खर्चाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जागतिक परिस्थितीही भारतासाठी पूर्णपणे अनुकूल नाही. पश्चिम आशियातील तणाव, जागतिक व्याजदरातील संभाव्य बदल, व्यापारधोरणातील अनिश्चितता आणि विकसित अर्थव्यवस्थांमधील मंदावलेली मागणी यांचा भारतीय निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. परदेशी गुंतवणूकदारांसाठीही जागतिक व्याजदर महत्त्वाचे असतात. अमेरिकेसह प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये व्याजदर वाढले किंवा जागतिक वित्तीय बाजारात जोखीम वाढली, तर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांकडून भांडवल बाहेर जाण्याचा धोका असतो. त्याचा परिणाम रुपयावर, शेअर बाजारावर आणि खासगी गुंतवणुकीवर होऊ शकतो. त्यामुळे पहिल्या तिमाहीतील ७.८ टक्के वाढ ही अंतिम यशाची घोषणा नसून पुढील आव्हानांसाठी मिळालेली मजबूत सुरुवात आहे. आर्थिक वाढीचा वेग टिकवण्यासाठी सरकारला तीन आघाड्यांवर विशेष लक्ष द्यावे लागेल. पहिले म्हणजे गुंतवणुकीला चालना देणे. दुसरे म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी उत्पन्न मजबूत करणे आणि तिसरे म्हणजे रोजगारनिर्मितीला वेग देणे. जीडीपीची वाढ तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा तिचे रूपांतर व्यापक उत्पन्नवाढीत होते.

देशात उत्पादन वाढले, सेवा विस्तारल्या आणि पायाभूत सुविधा निर्माण झाल्या; पण त्यातून रोजगाराच्या पुरेशा संधी निर्माण झाल्या नाहीत, तर आर्थिक वाढीचा सामाजिक लाभ मर्यादित राहतो. विशेषतः तरुण लोकसंख्या असलेल्या भारतासाठी रोजगाराचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. उच्च वाढीचा काळ हा रोजगारक्षम उद्योगांचा विस्तार करण्यासाठी वापरला पाहिजे. भारताने या क्षणी निराश होण्याचे कोणतेही कारण नाही. उलट, जागतिक अस्थिरतेच्या काळात ७.८ टक्के वाढ आणि ८.२ टक्के जीव्हीए वाढ ही अर्थव्यवस्थेची लवचिकता दाखवणारी बाब आहे; परंतु आत्मसंतुष्ट होण्याचेही कारण नाही. कृषी क्षेत्राचा दबाव, ग्राहक मागणीतील तुलनेने कमी वेग, तेलाच्या किमती, जागतिक वित्तीय परिस्थिती आणि वित्तीय तुटीवरील दबाव हे प्रश्न अजूनही कायम आहेत.

चर्चा आजची

# पावसाच्या कमतरतेमुळे जलसंकटाची भीती

अंतरा पारंगे

यावर्षी पावसाची स्थिती चिंताजनक असून, जिल्ह्यात दुष्काळाची परिस्थिती निमार्ण होते की काय अशी चर्चा सुरु झाली आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने पिण्याच्या पाण्यासह शेती आणि पशुधनासाठी पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे दिसून येत आहे. कारण ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. जून आणि जुलै महिन्यांपासूनच पावसाने ओढ दिल्याने ऑगस्टमध्ये तरी परिस्थिती सुधारेल, अशी आशा होती. मात्र ऑगस्ट महिन्यातही अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे राज्यातील शेतीचे आणि पाणी साठ्याचे गणित बिघडले असून, दुष्काळाचे सावट हळूहळू अधिक गडद होताना दिसत आहे.

जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाची स्थिती चिंताजनक आहे. पावसाची अनिश्चितता ही काही नवीन बाब नाही. मात्र यंदा सुरुवातीपासूनच पावसाने लावल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणजेच जूनमध्ये वेळेवर पुरेसा पाऊस न पडल्यामुळे अनेक भागांत पेरण्यांना विलंब झाला. पेरणी करण्यासाठी शेतकरी चातकासारखी पावसाची वाट पाहत होते. जून अखेर पाऊस सुरु झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी करायला सुरुवात केली. उशिरा का होईना पण पाऊस सुरु झाल्याने शेतकरी वर्गात उत्साह निर्माण झाला होता. मजुरांची कमतरता, वाढीव मजुरी देऊन आणि महागडी बियाणे, खते खरेदी करून शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवली आणि अनेक शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात अडकले. अशातच पुन्हा पेरणी करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण झाले. खर्चाचा आकडा मात्र वाढलेला असतो. त्यातून कर्जाचा फेरा सुरू होतो आणि मग या दुष्टचक्रामुळे काही शेतकऱ्यांच्या कुटुंबात दुःखाचे प्रसंग पाहावयास मिळते.

यावर्षी पाऊस कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. आज धरणे अपेक्षेप्रमाणे भरलेली नाहीत. सप्टेंबर महिन्यातच अशी स्थिती असेल तर यावर्षी जलसंकट अधिक तीव्र असल्याचे संकेत मिळत आहेत. यासाठी अतिशय काटेकोरपणाने पाणीवापर करण्याची गरज असून प्रशासकीय विभागानेही योग्य नियोजन करण्याची गरज आहे. एवढेच नाही जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही येत्या काळात गंभीर बनणार आहे. ग्रामीण भागात बरेच शेतकरी जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करतात. परंतु पावसाअभावी चारा उपलब्ध न झाल्यास पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहू शकते.



पावसाची अनिश्चितता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा ठेवता उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारणाच्या कामांना गती देणे याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. कारण पावसाअभावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. राज्यातील धरणांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झाला नाही तर आगामी उन्हाळ्यात अनेक गावांना आणि शहरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. अनेक भागांमधील परिस्थिती पाहिल्यास, तेथील लोकांचा बहुतांश वेळ पाणी भरण्यात जातो. उन्हाळ्यात तर मैलोन् मैल पायपीट करून हंडाभर, कळशीभर पाणी डोक्या-खांद्यावरून आणावे लागते. हे सर्व चित्र बदलण्यासाठी कायमस्वरूपी उपाय करण्याची गरज आहे.

पावसाची तूट राहिल्याने आगामी काळात तीव्र जलसंकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसोबतच पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी उपलब्ध जलसाठ्यांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. पाऊस कमी आणि तापमान अधिक असल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होण्यासोबतच पिकांच्या वाढीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. दुष्काळाचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. शेतीचे उत्पादन चांगले झाले तर शेतकऱ्यांच्या हातात पैसा येतो आणि ग्रामीण भागातील बाजारपेठेला चालना मिळते.

आधीपासूनच अनेक ग्रामीण भागांसह काही शहरांमध्ये पाण्याची स्थिती आधीच नाजूक आहे. कपडे आणि भांडे धुणे, बागकाम, बांधकामे यांसारख्या पिण्याव्यतिरिक्त इतर वापरांवरही शहरात दररोज लाखो लिटर पाणी वाया जाते. वाढती लोकसंख्या पाहता पाण्याचा पुरवठा करणे आधीच जिकरीचे झाले आहे. अशातच पावसाच्या कमतरेमुळे पाण्याची समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अनेक जलाशयांमधील पाणीसाठा अत्यंत कमी झाल्याने, पाणीटंचाईची चिंता वाढत आहे. जर लवकरच पावसाने सुधारणा केली नाही, तर येत्या काही महिन्यांत जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची गरज भागवणे, सिंचनाला आधार देणे आणि पाण्याचे व्यवस्थापन करणे यांसारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागू शकते.

यासाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आणि आवश्यक त्या भागात जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे याला प्राधान्य देणे गरजेचे झाले आहे. संकट आल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकटाची शक्यता लक्षात घेऊन आधीच तयारी करणे कधीही योग्यच.

लोकसंसद

## अनधिकृत बॅनरबाजीला आळा घालण्याची गरज

अनधिकृत बॅनरबाजीविरोधात नागरिकांमध्ये निर्माण झालेली जागरूकता ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. गणेशोत्सवातील डीजेच्या दणदणाटाला विरोध करण्यासाठी पुण्यात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने मोर्चा काढला, त्याचप्रमाणे शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या अनधिकृत बॅनर आणि जाहिरातींविरोधातही जनतेने आवाज उठवणे गरजेचे आहे. स्वच्छ, सुंदर आणि शिस्तबद्ध शहर ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विशेषतः धार्मिक उत्सव, राजकीय कार्यक्रम, वाढदिवस, शुभेच्छा आणि विविध समारंभांच्या निमित्ताने चौकाचौकांत मोठमोठे बॅनर लावले जातात. अनेकदा या बॅनरमुळे रस्ते, पदपथ आणि वाहतुकीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. काही ठिकाणी बॅनरमुळे वाहतुकीच्या संकेतांकडे किंवा दिशादर्शक फलकांकडे दुर्लक्ष होऊ शकते. केवळ बॅनर काढून टाकणे पुरेसे नाही; पुन्हा अनधिकृत बॅनर लावले जाणार नाहीत यासाठी सातत्याने देखरेख आणि दंडात्मक कारवाई आवश्यक आहे. नागरिकांनीही आपली सामाजिक जबाबदारी ओळखून अनधिकृत बॅनरबाजीला प्रोत्साहन देऊ नये.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

## स्वच्छ मुंबईच्या शिल्पकारांना मानाचा मुजरा!

मुंबई या महानगराला स्वच्छ ठेवण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम आपले स्वच्छता योद्धे अहोरात्र करीत असतात. गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणांच्या काळात मुंबईतील रस्ते, चौक आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी हे कर्मचारी दिवस-रात्र मेहनत करताना दिसतात आणि उत्सव, सोहळे संपल्यानंतर निर्माण होणारा कचरा, निर्माल्य आणि इतर वस्तू हटवून शहर पूर्ववत करण्याचे आव्हान ते निःशब्दपणे पेलतात. त्यांच्या श्रमामुळेच मुंबईची स्वच्छता आणि सौंदर्य टिकून राहते मात्र त्यांच्या अनमोल योगदानाची दखल आपण अनेकदा घेतोच असे नाही. त्यांना केवळ 'सफाई कर्मचारी' म्हणून न पाहता 'स्वच्छ मुंबईचे खरे शिल्पकार' म्हणून त्यांच्याकडे सन्मानपूर्वक पाहण्याची, सन्मानपूर्वक सन्मान देण्याची गरज आहे. त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा, त्यांच्या कष्टांना योग्य मान्यता आणि त्यांच्या कार्याबद्दल समाजात कृतज्ञतेची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. डिलाईल रोडच्या पंचगंगा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सफाई कर्मचाऱ्यांच्या योगदानाला अनोख्या पद्धतीने सलाम केला, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला मनापासून सलाम!

**– विश्वनाथ पंडित, ठाणे**

दिनविशेष

# अंतराळवीर सुनीता लिन विल्यम्स



भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता लिन विल्यम्स यांनी अंतराळात सुनी आणि स्लोव्हेनियात म्हणून ओळखण्यात येते. सुनीता विल्यम्स अंतराळवीर होण्यापूर्वी युनाडेट स्टेटमध्ये नेव्ही अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. अंतराळवीर झाल्यानंतर विल्यम्स यांनी नेक अंतराळवीर मोहिंमासाठी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात आयएसएसवर आपला वेळ घालवला. ५ जून २०२४ रोजी विल्यम्स एका मोहिमेसाठी आयएसएसवर गेल्या होत्या. सुनीता विल्यम्स यांच्या नावावर सर्वात जास्त काळ अंतराळ यात्रा करणाऱ्या महिलेचा विक्रम आहे.

सुनीता विल्यम्स यांचे वडील दीपक पांड्या मूळचे गुजरातच्या अहमदाबादमधल्या मेहसाना जिल्ह्यातील झुलासन गावचे रहिवाशी होते. दीपक पांड्या यांनी आपले वैद्यकीय शिक्षण अहमदाबादमध्ये पूर्ण केले. दीपक यांचे भाऊ नवीन अमेरिकेत होते. नंतर दिपक पांड्या देखील अमेरिकेत गेले आणि वैद्यकीय क्षेत्रात आपली सेवा बजावली. दिपक पांडयां यांना यादरम्यान बोनी झोलोकर यांच्याशी त्यांची मैत्री झाली आणि नंतर मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. पुढे दोघांनी लग्न केले आणि दीपक पांड्या अमेरिकेतच स्थायिक झाले. दीपक आणि बोनी यांना जय, दिना आणि सुनीता अशी तीन मुले झाली. १९ सप्टेंबर १९६५ रोजी अमेरिकेच्या ओहियोमध्ये सुनिता यांचा जन्म झाला आहे. सुनिता सर्वांमध्ये लहान होत्या. दीपक हिंदू आणि आई कॅथलिक असल्याने घरात संमिश्र वातावरण आणि सर्व धर्मांप्रती आदर करण्याची शिकवण त्यांना लहानपणापासूनच मिळाली आहे. सुनीता विल्यम्स यांनी १९८३ मध्ये नीडहॅम हायस्कूलमधून आपले ग्रॅज्युएशन पूर्ण केले आहे. नंतर त्यांनी १९८७ मध्ये विल्यम्स युनायटेड स्टेट्स नेव्हल अकादमीमधून भौतिकशास्त्रात विज्ञान पदवी मिळवली. १९९५ मध्ये विल्यम्स यांनी फ्लोरिडा येथे इनस्टिस्टूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून मास्टर ऑफ सायन्सची पदवी मिळवली. त्यानंतर भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स १९८७ मध्ये अमेरिकेच्या नौदलात सामील झाल्या. तिथे त्यांनी बराच काळ आपल्या सेवेचे योगदान दिले. सुनीता विल्यम्स यांनी नेव्हल कोस्टल अकादमीमध्ये सहा महिन्यानंतर त्यांची बेसिक डायव्हिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि काही काळानंतर त्यांना नेव्हल एअर ट्रेनिंग कमांडमध्ये सेवा देण्याची संधी प्राप्त झाली. १९८९ मध्ये त्यांना नेव्हल एव्हिएटर म्हणून नोकरी मिळाली. नंतर जून १९८९ मध्ये सुनीता विल्यम्स यांची अंतराळवीर म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी रशियन अंतराळात संस्थेतून आपल्या अंतराळवीराचा पहिला प्रवास सुरु केला. नंतर २००६ मध्ये त्यांनी पहिले अंतरिक्ष उड्डाण केले. २०१२ मध्ये सुनीताने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर मोहिमा करण्यासाठी नासासोबत आपला प्रवास सुरू केला.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
**१९ सप्टेंबर**
१) श्री.सुषमा शशिकांत राउत चेंढरे-अलिबाग, दि.१८-९-१९३०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**सौ. वैशाली दिलेश नागदा, वाढदिवस, अलिबाग**

**श्री इंद्रनील पोतनीस, वाढदिवस अलिबाग**



**कै. दत्तात्रय लक्ष्मण पाटील, स्मरणार्थ, अलिबाग**

# चाकरमान्यांचे परतीची लगबग

## • तब्बल अडीच हजार बसेस नियोजन • २ हजार बसेसचे आरक्षण पूर्ण

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात वाजतगाजत लाडक्या गणरायाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. लाडक्या गणरायाच्या आगमनाने कोकणातील गावागावांत उत्साहाला उधाण आले असून, मुंबईसह विविध शहरांतून लाखो चाकरमानी रत्नागिरी जिल्ह्यात दाखल झाले आहेत. भक्तीमय वातावरणात बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर आता गणेशोत्सवाच्या उत्तरार्धात चाकरमान्यांच्या परतीच्या प्रवासाची लगबग सुरू झाली आहे.



गणेश विसर्जनानंतर मुंबई, पुण्यासह अन्य शहरांकडे परतणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरळीत आणि सुखकर व्हावा, यासाठी रत्नागिरी एसटी विभागाने तब्बल २ हजार ५०० एसटी बसेसचे नियोजन केले आहे. गणेशोत्सवासाठी यंदा मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात दाखल झाले आहेत. अवघ्या तीन दिवसांत सुमारे ३ हजार एसटी बसेसच्या माध्यमातून लाखो प्रवाशांनी रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश केला.

गणरायाच्या आगमनाने कोकणातील वातावरण भक्तीमय झाले असले, तरी विसर्जनानंतर पुन्हा शहरांकडे परतीची तयारी सुरू होणार आहे. ही संभाव्य गर्दी लक्षात घेऊन रत्नागिरी विभागाने परतीच्या प्रवासासाठी अडीच हजार एसटी बसेस सज्ज ठेवल्या आहेत. विशेष म्हणजे, एसटी महामंडळाने सुमारे २० दिवसांपूर्वीच या विशेष बसेसचे आरक्षण खुले केले होते. त्याला प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत तब्बल २ हजार बसेसचे आरक्षण पूर्ण झाले आहे. यामध्ये तब्बल ८०० बसेसचे ग्रुप बुकिंग झाले आहे. विसर्जनानंतर रत्नागिरी विभागातून

### महिला, ज्येष्ठ नागरिकांना सवलत

गणेशोत्सवात यंदाच्या वर्षी महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलत असणार आहे. महिला, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना तिकिटात ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के सवलत असणार आहे.

या बसेस मुंबईच्या दिशेने तसेच पुणे व अन्य प्रमुख शहरांकडे रवाना होणार आहेत. त्यामुळे शेवटच्या क्षणी तिकीट मिळविण्यासाठी होणारी धावपळ टाळण्यासाठी प्रवाशांनी आताच आरक्षण करण्याचे आवाहन एसटी विभागाने केले आहे. परतीच्या प्रवासासाठी नियोजित अडीच हजार बसेसपैकी दोन हजार बसेस आधीच आरक्षित झाल्याने आता मोजक्याच बसेस उपलब्ध आहेत. त्यामुळे ज्या गणेशभक्तांनी अद्याप परतीचे तिकीट आरक्षित केलेले नाही, त्यांनी विलंब न करता ऑनलाइन तिकीट बुकिंग करून आपला प्रवास निश्चित करावा, असे आवाहन एसटी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात कोकण रेल्वे, खासगी वाहतूक आणि एसटीवर मोठा ताण येतो. अशा परिस्थितीत एसटी महामंडळाने केलेले विशेष नियोजन चाकरमान्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. गणरायाला निरोप दिल्यानंतर परतीच्या प्रवासात गर्दीचा सामना करण्याऐवजी आगाऊ आरक्षण करून प्रवासाचे नियोजन करणेच अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर ठरणार आहे.

## नागोठणे विभागात गौराईचे आगमन

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील नागोठणे विभागातही महिलांनी गुरुवारी सायंकाळी ढोल-ताशाच्या गजरात आपल्या लाडक्या गौराईचे स्वागत केले. यावेळी महिलांमध्ये उत्साह दिसून येत होता. तसेच नागोठण्याजवळील बाळसई गावातील महिलांनीही गौराईला पारंपारिक पद्धतीने घरी आणले. यावेळी बाळसई गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गणेशोत्सव काळात गणपती येवढेच गौरीलाही तितकेच महत्व दिले जाते. महालक्ष्मीच्या मुखवट्यामध्ये किंवा शाडु मातीचे, पितळाचे तसेच कापडाचे मुखवटे पहावयास मिळतात. ज्या दिवशी



गौराईच आगमन होतं त्यादिवशी सर्व महिला माळरानात जाऊन तेरड्यांच्या फुलासह इतर विविध प्रकारची फुले आणुन त्यामध्ये गौराईचे मुखवटे सजवुन वाजत -गाजत घरी गौराईचे जोरदार स्वागत केले जाते. शुक्रवारी (दि.१८) सप्टेंबर रोजी नागोठणे शहर व नागोठणे ग्रामीण परिसरात ज्येष्ठ गौराईचे विधिवत पूजन केले.

## राहुल फार्मसी महाविद्यालय रक्तदान शिबीर

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयात समर्पण रक्त केंद्र घाटकोपर व मेडिकल टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ रायगड यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत-खालापुर तालुक्यात आयोजित केलेले ५४६ वे रक्तदान शिबीर होते. याप्रसंगी राजाभाऊ कोठारी, झुलकरनैन डाभिया, विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, किरण ज्योती, कल्पेश पटेल, अभिलाषा पटेल, सुमित जाधव, डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. निलोफर खान, प्रा. अनिकेत इंदुलकर आणि संजय



(छाया – संजय गायकवाड)

चौधरी यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. रक्त संकलन डॉ. रमेश सिंग, शिला वाघमारे, दिपेश सरदार, श्रीराम नाईक, प्रदीप नितोरे, सुनिल निले आदींनी केले. सूत्रसंचालन प्रिया खापे यांनी केले. याप्रसंगी डॉ. रुपाली येवले, प्रा. श्वेता दांगट, प्रा. मुक्ता गोचडे, तुषार घारे, सानिका जाधव, आदित्य अलिकडे, रूद्र जाधव, प्रणव जाधव, हेमंत जाधव, भाग्यश्री पोद्दार, राज गुप्ता, श्रद्धा वाघचौरे, भाविका सोनावणे, संजित घोडके, हर्षाली कल्पेश, ऋतुजा सावंत, आदी उपस्थित होते.

## कोळी बांधवांच्या नौका किनाऱ्यावर

**दापोली** : कोकणाच्या मातीत गणेशोत्सवाची लगबग सुरू असताना समुद्रकिनाऱ्यावर मात्र, वेगळेच चित्र दिसत आहे. वर्षभर समुद्राशी झुंज देत मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या नौका सध्या किनाऱ्यावर विसावल्या आहेत. गणरायाच्या स्वागतासाठी मासेमारीला काही दिवसांची विश्रांती देत कोळी बांधव कुटुंबासमवेत गणेशोत्सवाच्या आनंदात सहभागी होत आहेत. त्यामुळे अन्य वेळी मासेमारीच्या नौकांनी गजबजलेली बंदरे आणि किनारे सध्या शांत दिसत आहेत. गणेशोत्सव कोकणवासियांसाठी केवळ धार्मिक उत्सव नसून घराघरांत जपली जाणारी परंपरा आहे. चाकरमानी गावाकडे परतले आहेत, घरे सजली आहेत आणि गणरायाच्या आगमनाने वातावरण भक्तिमय झाले आहे. या उत्सवात समुद्राशी नाते जोडलेल्या कोळी समाजाचाही उत्साह तितकाच ओसंडून वाहत आहे. गणपतीची प्रतिष्ठापना, पूजन, आरती, नैवेद्य तसेच नातेवाईकांच्या भेटीगाठी यासाठी कोळी बांधवांनी मासेमारीला विराम दिला आहे. यामुळे दापोलीसह कोकणातील विविध किनारपट्टी भागात मासेमारीच्या नौका समुद्रात न जाता किनाऱ्यावर उभ्या असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची सांगता

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची सांगता झाली. या निमित्ताने जैन बांधवांनी भगवान महावीरांच्या मूर्तीची कर्जत शहरातून मिरवणूक काढली व जैन मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली. याप्रसंगी मोठ्या संख्येने जैन बांधव व भगिनी उपस्थित होत्या. मिरवणूक जैन मंदिरापासून सुरू होऊन रेल्वे स्टेशन व पोस्ट जवळून आंबेडकर पुतळा जवळ मस्जिद ते जैन मंदिर अशी काढण्यात आली. जैन मंदिरा जवळ मिरवणुकीची सांगता झाली.

या मिरवणुकीत सुधाकर घारे, संतोष पाटील, सुवर्णा जोशी, अशोक ओसवाल, अशोक राऊत, महेंद्र चंदन, प्रशांत



(छाया – संजय गायकवाड)

पाटील, राजाभाऊ कोठारी, रोहित ओसवाल, अजित ओसवाल मोहन ओसवाल, फुटरमल जैन, निहालचंद बाबूलालजी, उमेदमल पुनमिया, छगनलाल तिलोकचंद, चंपालाल ओसवाल, दीपचद जैन, दिनेश जैन, प्रकाश ओसवाल, सुभाष सोलंकी, जितेंद्र ओसवाल, साजन ओसवाल, प्रकाश जैन, पंकज ओसवाल, अरविंद जैन, राजू परमार, विजय परमार, भरत सोलंकी, मुकेश ओसवाल, योगेश ओसवाल, राजेश जैन, रमेश ओसवाल, संतोष ओसवाल, भावना ओसवाल, ललिता ओसवाल, सुरेखा ओसवाल, मनिषा ओसवाल, सविता परमार आदींसह जैन बांधव-भगिनी उपस्थित होत्या.

## तळा तालुक्यात गौरीचे आगमन

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यात गावोगावी सोनपावलांनी ज्येष्ठा गौरीचे आगमन झाले असून त्यामुळे महिला वर्गात उत्साहाचे वातावरण पसरले आहे. वर्षभर ज्या दिवसाची माहेरवाशीण आतुरतेने वाट पाहतात, तो म्हणजे गौराई आगमनाचा. जेव्हा लक्ष्मीला माहेरपणाचे सुख अनुभवावेसे वाटते तेव्हा ती गौराईच्या रूपाने येते, अशी आख्यायिका सांगितली जाते. दुसऱ्या दिवशी तिला पानाफुलांची आरास, शेवंतीची वेणी, हार, चाफा व केवड्याचे पान वाहून पक्वान्नांचा नैवेद्य दाखवला जातो. तिसऱ्या



दिवशी खीर-कानवल्याचा नैवेद्य दाखवून तिची पाठवणी केली जाते. कोकणात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून माहेरी आलेल्या महिलांना आपल्या मैत्रिणींसोबत हा सोहळा साजरा करता येत असल्याने दुहेरी आनंद साजरा होत आहे.

## नागोठण्यात चंद्रप्रभू स्वामीजींचा पालखी सोहळा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

जैन धर्मीयांच्या पवित्र पर्युषण महापर्वाच्या प्रारंभानिमित्त नागोठणे येथे जैन तीर्थंकर भगवान चंद्रप्रभू स्वामीजींच्या भव्य पालखीचे आयोजन बुधवारी (दि.१६) करण्यात आले होते. नागोठण्यातील जैन बांधवांकडून अत्यंत भक्तीभावपूर्ण हा धार्मिक सोहळा उत्साहात संपन्न झाला.

नागोठणे येथील जैन मंदिरातून भगवान चंद्रप्रभू स्वामीजींच्या पालखीचे सकाळी प्रस्थान झाले. संपूर्ण नागोठणे गावातून प्रदक्षिणा घालत ही पालखी पुन्हा जैन मंदिरात आल्यानंतर या धार्मिक सोहळ्याचा समारोप झाला.

यावेळी जैन बांधवांनी सहभागी होत भगवान चंद्रप्रभू स्वामीजींचे दर्शन व आशीर्वाद घेतले. याप्रसंगी किशोर जैन, नरेंद्र जैन, प्रकाश जैन, प्रवीण जैन, ज्ञानेश्वर साळुंखे, मोहन नागोठणेकर, जुगन प्रतापमल जैन, अकलाख पानसरे, सोहन जैन, संतोष कावेडिया, श्रीपाल उर्फ बंटी जैन आदींसह असंख्य जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आई भवानी प्रतिष्ठानतर्फे चित्रकला स्पर्धा

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील निसर्गरम्य धारवली गावात बाल आणि युवा कलागुणांना ओळख मिळवून देण्यासाठी आई भवानी प्रतिष्ठानच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यात दडलेल्या कल्पकतेला, रंगांना आणि भावनांना सशक्त व्यासपीठ मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य ध्यास आहे.

डिजिटल युगात कागद आणि रंगांपासून दुरावणाऱ्या पिढीला पुन्हा एकदा निसर्ग, कला आणि सर्जनशीलतेशी जोडण्यासाठी हा पुढाकार घेतला आहे. स्पर्धेचे



स्वरूप व महत्त्वाचे गट: अट्टुट कल्पकता (लहान गट): प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांसाठी निसर्गचित्र व रंगभरण. सामाजिक प्रबोधन (मोठा गट): माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण संवर्धन, माझे स्वप्नातील धारवली गाव आणि डिजिटल युगातील माझी संस्कृती.

या महास्पर्धेतील विजेत्यांना आई भवानी कला गौरव चषक, सन्मानपत्र, शैक्षणिक साहित्य संच आणि रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात येणार आहे.

# गौराईच्या आगमनाने आनंद द्विगुणित

**देविदास म्हात्रे**

**श्रावण महिना संपताच वेध लागतात ते भाद्रपदात येणाऱ्या गौरी गणपतीचे. गणपतीच्या आगमनानंतर तीन दिवसांनी येणारी ही गौराई (कधी कधी तिथीच्या बदलाने मागेपुढे) निसर्गाचेच रूप आहे. तिचीही रूपे वेगवेगळी आहेत. गणपतीच्या आदल्या दिवशी हरितालिका पुजनाने शंकराला प्रसन्न करणारी उमा गणपतीच्या आगमनानंतर लगेचच आपल्या मुलाचा विरह सहन न होऊन की काय तर ती ही आपल्या भेटीला येते. तिच्या येण्याची वाट प्रत्येक स्त्री पाहते. कारण ती माहेरवाशीण असते ना ।। रूणझुणुत्या पाखरा, जारे माझ्या माहेरा, आली गौराई अंगणी, घाली लिंबलोण सडा ।। अशी अनेक गाणी गौराईवर रचली गेली आहेत.**

गणपतीबरोबर येणारी गौरी म्हणजे सासुरवाशीणीला माहेरी जाण्याचा हक्काचा दिवस आणि गृहिणींसाठी पर्वणीच असते. महाराष्ट्रात गणेशोत्सवामध्ये



गौरींचे आगमन समस्त महिलावर्गाचा आनंद द्विगुणित करते. गौरीपूजन हे गणपती उत्सवातील एक अविभाज्य अंग आहे. खासकरून कोकणात गौरींच्या आगमनाला अनन्यसाधारण महत्व असते. कोकणात गणपती आगमन येताच स्त्रीया गौरीपूजनाच्या तयारीला लागतात. काही ठिकाणी गौरींचे उभे मुखवटे, पितळी मुखवटे तर काही घरांमध्ये शाडूपासून व प्लॅस्टर ऑफ पॅरिस पासून बनविलेल्या मुर्ती व मुखवट्यांची जमवाजमव केली जाते. स्त्रीया गणपतीशेजारीच गौरीची स्थापना करण्याची सोय करतात. गौरींचे आगमन म्हणजे स्त्रीयांसाठी आनंदाची पर्वणीच असते. पेणच्या खारेपाटामध्ये महिला वर्ग गौरीला हात सोडून डोक्यावर घेउन नाचवत घरी आणतात यामध्ये वैशिष्ट पुर्ण गौरीची तेरडयांची सजावट देखील असते हे खारपाटातील खास आर्कषण असते.

महाराष्ट्रात गौरीची पूजा चार नावाने केली जाते. चैत्रगौरी, मंगळागौर, हरतालिका आणि भाद्रपद महिन्यात येणारी ज्येष्ठगौरी. भाद्रपद महिन्यातील अष्टमीला येणाऱ्या गौरीचे महत्व इतर तीन गौरींपेक्षा वेगळे असते. कोकणात गौरींच्या दिवशी माहेरी आलेल्या स्त्रीयांसाठी व गौराईसाठी घराघरांतून मांसाहाराचा बेत आखला जातो. गौरींच्या दिवशी मांसाहाराचा बेत करण्याची प्रथा ही एक आश्चर्यकारक व इतरांपेक्षा वेगळी असलेली प्रथा आहे. पेण तालुक्यात आज सर्वत्र गौरीच्या पूजनाने वातावरण मंगलमय झाले आहे. नवीन सासुरवाशीणीला ववसा देण्यासाठी सुप खरेदीसाठीदेखील स्त्रियांनी गर्दी केली होती.

सकाळपासूनच गौरीला सजविणे ते गौरीच्या नैवेद्यासाठीच्या खाद्यपदार्थांची तयारी करण्यापर्यंत तसेच गौरीपूजनासाठी स्त्रीयांची लगबग सुरू होती. दुपारी बाराच्या सुमारास सर्वत्र गौरीची आरती होऊन नैवेद्य दाखविला गेला. त्यानंतर माहेरवाशिणीचा हा दिवस हक्काचा असल्याने त्या निमित्ताने या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गौरी-गणपतीच्या विविध गाण्यांवर फेर धरून या महिला नृत्य करून गौराईचे जागरण करतात आणि रात्रभर माहेरवाशिनी स्त्रिया गौरीच्या आगमणाचा मनोमन अनंद लुटतात.

# निवडक

## सुपांमुळे बुरूड व्यावसायिकांना दिलासा



**चिपळूण** : सणासुदीच्या काळात पारंपरिक वस्तूंना असलेली मागणी बुरूड व्यावसायिकांसाठी यंदा चांगली संधी ठरली आहे. गणेशोत्सवातील गौरीपूजनासाठी लागणाऱ्या बांबूच्या सुपांना मागणी वाढल्याने चिपळूणच्या भाजीमंडईच्या मागील बाजूस बुरूड व्यावसायिकांच्या हातांना काम मिळाले असून, सुपे तयार करण्याची लगबग सुरू आहे. तयार सुपांच्या खरेदीसाठी नागरिकांचीही गर्दी होत असल्याने बुरूड व्यावसायिकांना सुगीचे दिवस आले आहेत. बांबू कापणे, त्याच्या पट्ट्या तयार करणे आणि त्यापासून विविध आकारांची सुपे विणणे, अशी कामे सध्या वेगाने सुरू आहेत. स्थानिक बुरूड व्यावसायिक हाताने सुपे तयार करत असून, आकार व नक्षीनुसार त्यांची विक्री केली जात आहे. यंदा मोठ्या आकाराच्या सुपांना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. सुपांचे दर साधारण १०० ते १८० रुपये तर लहान सुपे ८० ते १०० रुपये दराने विकली जात आहेत. आकर्षक वेणीच्या नक्षीची सुपे २०० ते ३०० रुपये दराने उपलब्ध आहेत. सुपांसोबत सुपल्या तसेच बांबूपासून तयार केलेल्या अन्य पारंपरिक वस्तूंनाही ग्राहकांची पसंती मिळत आहे.



## घराघरांत गौरीचे महिलांकडून पूजन

**खांदा कॉलनी** : गणरायाच्या आगमनानंतर आता घराघरांत गौरीच्या आगमनाची लगबग सुरू झाली आहे. गुरुवारी तेरड्याच्या रूपाने गौरीचे आगमन झाल्याने महिलावर्गात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. सकाळपासूनच महिलांनी घराची स्वच्छता करून गौरीच्या स्वागतासाठी विशेष तयारी केली होती. पारंपरिक पद्धतीने तेरड्याचे पूजन करून गौरीला घरात मानाचे स्थान देण्यात आले. गौरीच्या स्वागतासाठी घराच्या प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. फुलांची सजावट, तोरणे आणि विविध पूजेच्या साहित्याने घरातील वातावरण भक्तीमय झाले होते. महिलांनी मनोभावे गौरीचे पूजन करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. काही ठिकाणी पारंपरिक पद्धतीने गौरीला साडी, दागिने आणि फुलांनी सजविण्यात आले. गौरी आगमनानिमित्त महिलांनी एकमेकींच्या घरी जाऊन गौरीचे दर्शन घेतले. घराघरांत सणासुदीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील दोन दिवस विविध धार्मिक विधी आणि नैवेद्याची तयारी केली जाणार आहे. तेरड्याच्या रूपातील गौरीचे आगमन हा महिलांसाठी श्रद्धा, परंपरा आणि कौटुंबिक आनंदाचा सोहळा ठरला आहे.

## झाडांना छिद्रे पाडून ‘विषप्रयोग’

**उरण** : नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे किमान २० पूर्ण वाढ झालेल्या झाडांना छिद्रे पाडून त्यामध्ये रासायनिक द्रव्य सोडल्याचा आरोप पर्यावरण कार्यकर्त्यांनी केला आहे. झाडांमधून द्रव बाहेर येत असून परिसरात रसायनाचा उग्र वासही जाणवत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनने या प्रकाराची माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे (मनपा) आयुक्तांनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. झाडांना मुद्दाम छिद्रे पाडण्यात आली असून त्यातून द्रव बाहेर येताना मी स्पष्टपणे पाहिले, असे पर्यावरण कार्यकर्त्या परमदीप ग्रेवाल यांनी सांगितले. पारसिक ग्रीन्सचे संयोजक विष्णू जोशी यांनी ग्रेवाल यांच्यासोबत घटनास्थळाची पाहणी केली. झाडांजवळ रसायनाचा उग्र वास जाणवत होता,असे त्यांनी सांगितले. झाडांच्या खोडाचा आणि तळाचा भाग तोडून किंवा सोलून त्यामध्ये द्रव्य सोडल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याचा दावा जोशी यांनी केला. या प्रकारामागे काही हितसंबंधी व्यक्तींचा हात असण्याची शक्यता नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी व्यक्त केली आहे.





## ममदापूर गावाकडे जाणारा रस्ता तयार

**नेरळ** : कर्जत तालुक्यात नेरळ विकास प्राधिकरणाचा भाग असलेल्या ममदापूर गावाकडे जाणारा रस्ता गेली दोनवर्षे पाण्यात बुडत होता. त्यामुळे स्थानिकांना एकतर पर्यायी मार्ग किंवा त्या पाण्यातून वाट काढत नेरळकडे किंवा गावात जावे लागत होते. दरम्यान, नेरळ विकास प्राधिकरणाकडून या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे ऐन गणेशोत्सवामध्ये पाण्यात वाट काढण्याचे त्रास संपले आहेत. यावर स्थानिक तरुणांनी समाज माध्यमांवर जोरदार आक्षेप घेतला होता. तर सलग दोन तास पाऊस पडल्यावर ग्रामस्थांची गावाकडे जाणारी वाट पाण्यात जात होती याचे सचित्र दर्शन माध्यमांनी दाखवले होते. तरी देखील शासनाला काही देणेघेणे दिसून येत नव्हते. त्यात त्या रस्त्यावर असलेले एका बिल्डरकडून नैसर्गिक पाणी वाहून नेणारा नाला बंद करण्यात आला होता.त्याचा मोठा फटका रस्त्यावर पाणी साचणे आणि रस्त्यावरून पाणी वाहून जाण्याचे प्रकार पावसाळ्यात सतत घडत होते. ही बाब ग्रामस्थांनी सातत्याने उचलून धरली अखेर नेरळ विकास प्राधिकरणांना जाग आली असून ममदापूर गावाकडे जाणारा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करून घेतले आहे. आता ऐन गणेशोत्सव काळात हा रस्ता खुला करण्यात आला असून ममदापूर ग्रामस्थांचे गावाकडे जाण्याचे कष्ट आता थांबले आहेत.

# घाऊक मासळीच्या दरात घट

**बोटींमुळे मासळीची आवक वाढली**
**मच्छिमारांवर आर्थिक संकट आले**

| उरण | प्रतिनिधी |

मासेमारीचा नवा हंगाम १५ ऑगस्ट पासून सुरू झाला आहे. गेले महिनाभर अनेक कारणांनी मासळी मिळत नव्हती त्यामुळे मासळीचे दर वाढले होते. मात्र सद्या एकाच वेळी आलेल्या अनेक बोटींमुळे घाऊक मासळीच्या दरात घट झाल्याचा दावा मच्छिमारांनी केला आहे. त्यामुळे अधिकची मासळी येऊनही मच्छिमारांवर आर्थिक संकट आले आहे.



मासेमारी हंगामाची सुरुवात होत असताना मच्छिमारांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येते. यामध्ये ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी-विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससूनडॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते.

दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे फिशिंग-डॉक करंजा येथे उभारण्यात आले आहे. येथे बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे, नव्याने सुरू झालेल्या करंजा द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत. यामध्ये, सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत.

करंजा येथील या बंदरात १०० रुपयांपासून १२०० रुपये किलोच्या दराने मासळी विक्री करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. तर, मासळी खरेदी करण्यासाठी अनेक व्यावसायिक देखील गर्दी करू लागले आहेत. करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासे देखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे. तर, या मासळी बाजारात सुरमई, कोलंबी, कुपा, पापलेट, कलेट यांना अधिक मागणी आहे.

**करंजा बाजारातील प्रतिकिलो दर**

कोलंबी २५० ते २०० रुपये
पापलेट १००० ते ६०० रुपये
सुरमई ८०० ते ४०० रुपये
कलेट १००० ते ६०० रुपये
कुपा २०० ते १८० रुपये
तेल बांगडा १८० ते २१० रुपये
रिबन फिश १७०-२०० रुपये
हलवा ४००-२०० रुपये

**बोंबीलचे दर घसरले**

जून आणि जुलै महिन्यात बोंबीलचे दर किलोला २०० ते १५० रुपये होते. आता मासळीची आवक वाढल्याने दर कमी होऊन ते प्रतिकिलो ५० रुपयांवर आले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य खवय्यांना याचा लाभ मिळत आहे.

## तटरक्षक दलातर्फे स्वच्छता मोहीम

**आगरदांडा** : आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिनानिमित्त १९ सप्टेंबर रोजी स्वच्छ सागर आणि सुरक्षित तट अभियानांतर्गत मुरुड किनारपट्टी भव्य स्वच्छता मोहिमेचे आयोजन भारतीय तटरक्षक दल केंद्र, जेएसडब्ल्यू आणि इनकोईस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. या मोहिमेचे नेतृत्व कमांडर जयदीप पॉल, शास्त्रज्ञ लक्ष्मीकांत ढगे, प्रा. बी. जी भवारे करणार आहेत. याप्रसंगी जेएसडब्ल्यूचे प्रतिनिधी व आयुष रुग्णालयाचे अधिकारी उपस्थित राहणार असून शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी व परिसरातील नागरिकांसह ५०० हून अधिक स्वयंसेवक एकत्र येऊन किनाऱ्यावरील प्लास्टिक कचरा निर्मूलनासाठी श्रमदान करणार आहेत.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की मी खालील वर्णनाची मिळकत जमीन सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने खरेदी घेण्याची ठरविलेली आहे. सदरहु जमीन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटींस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नांवे दाखल आहे त्या मिळकतीचे रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मौजे-भोईरवाडी, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| जमीन मालकांची नांवे | गावाचे नांव | सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| श्री.रशिद हसनमिया पटेल रा-सावेले. तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड | भोईरवाडी | २१/१ | ०-८२-९० |

तरी वरील प्रमाणे मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, ताबा, बयाणा पावती, गहाण दान, बक्षिस भाडेपट्टा, बोजा, जप्ती कुळवहिवाट, इजमेंट, चार्ज, मृत्युपत्रांकित दान, लिज, लिएन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आंत खालील सही करणार यांचे पत्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत कळवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यांत यावी. याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यांस वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करुन आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस दिली.

दिनांक - १९/०९/२०२६

सही
**श्री.भारत रमेश मुरकुटे**
रा ३०२, आर/१. मुद्रे बुद्रुक,
तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड.
मोबाईल नंबर-९८२२८९७२९९


# सेवा सेतू कॅम्पचे आयोजन

| रायगड | प्रतिनिधी |

केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा सेतू कॅम्पचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत पीएम सूर्य घर मोफत वीज योजना आणि स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष किओस्क उभारणार आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कर्जासाठीही अर्ज करता येईल. मपीएम सूर्य घर मोफत वीज योजनाफ आणि स्मार्ट योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

# वाळवटी खिंडीत अपघाताचा धोका

| श्रीवर्धन | वार्ताहर |

श्रीवर्धन-दिवेआगर या मार्गावरील वाळवटी डागेतील धोकादायक वळणे आणि तीव्र उतार सध्या वाहनचालकांना त्रासदायक ठरत आहेत. या मार्गावर पर्यटकांची आणि स्थानिक नागरिकांच्या वाहनांची नेहमीच वर्दळ असते. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून येथे सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही आवश्यक उपाययोजना आखण्यात आल्या नाहीत.



गेल्या आठवड्यातच या ठिकाणच्या तीव्र उताराच्या वळणावर एका पर्यटक वाहनचालकाचा चारचाकी वाहनावरील ताबा सुटला. वळणाचा आणि उताराचा अंदाज न आल्याने हे वाहन रस्त्याखाली गेले. सुदैवाने, खाली असलेल्या एका झाडाला गाडी धडकल्याने मोठा अनर्थ टळला आणि जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे या मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या मार्गावर अजुनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून धोका दर्शवणारे माहिती किंवा सूचना फलक बसवण्यात आलेले नाहीत. तसेच रस्त्याच्या कडेला मजबूत संरक्षण कठडे नसून रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसतील असे रेडियम रिफ्लेक्टर्सही लावण्यात आलेले नाहीत. अर्थसंकल्पात संरक्षण कठड्यासाठी निधी मंजूर झाला आला असून, ते काम लवकर अंतिम टप्प्यात पोहोचेल, असे सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीवर्धन कार्यालयाकडून सांगण्यात आले. वाळवटी डागेत मोठ्या दुर्घटनेची वाट न बघता सार्वजनिक बांधकाम विभागाने संरक्षण कठडे, रेडियम व फलक आणि रम्बल स्ट्रिप्स सारख्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक वाहनचालक व पर्यटकांकडून केली जात आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण व पेणधर येथील शाळांकरीता तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबत इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेमार्फत अर्ज मागविणेत येत आहेत. जागा मागणीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | ठिकाण | क्षेत्रफळ (चौ. फुट) |
|---|---|---|
| १) | फरशीपाडा | १००० |
| २) | आडिवली | १००० |
| ३) | रोहिंजण | १५०० |
| ४) | पेणधर | ५००० |

इच्छुक व्यक्ती/संस्था/जागामालक यांनी जागेचे आवश्यक कागदपत्रे, क्षेत्रफळ, नकाशे यासहित अर्ज दिनांक २५/०९/२०२६ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत pmcmalmatta2018@gmail.com या ईमेलवर अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त (मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/माव्य/९९२६/प्र.क्र.५३/४४९/२०२६
दिनांक :-१८/०९/२०२६


# कळंबोलीत नशेविरोधात दंड थोपटले!

**पनवेल** : गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ आणि अमली पदार्थांच्या वाढत्या वापराविरोधात कळंबोलीत जनजागृतीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. नो गुटखा, नो ड्रग्स अभियानांतर्गत सिडको उद्यानात नागरिकांनी एकत्र येत नशामुक्तीचा निर्धार केला. या उपक्रमात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.यावेळी उपस्थितांनी गुटखा खाणार नाही आणि गुटखा खाऊ देणार नाही अशी सामूहिक शपथ घेतली. कळंबोली परिसर नशामुक्त करण्यासाठी सातत्याने जनजागृती करण्याचा निर्धारही करण्यात आला. कळंबोलीचा झपाट्याने विस्तार होत असून मोठ्या संख्येने तरुणवर्ग येथे वास्तव्यास आहे. या पार्श्वभूमीवर तरुणांना व्यसनांच्या विळख्यापासून दूर ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गुटखा, तंबाखू आणि अमली पदार्थांच्या व्यसनामुळे आरोग्यासह शिक्षण, रोजगार आणि जीवनावरही परिणाम होऊ शकतो. पालकांनी मुलांशी संवाद साधण्याबरोबरच नागरिकांनीही व्यसनमुक्तीच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, गुटखा आणि अमली पदार्थांची अवैध विक्री करणाऱ्यांवर संबंधित प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली. केवळ जनजागृती करून न थांबता अवैध विक्रीच्या ठिकाणांवर नियमित तपासणी आणि प्रभावी कारवाई करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

# महसूल लोक अदालतीचे आयोजन

| रायगड | प्रतिनिधी |

उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या अलिबाग येथील न्यायालयात, तहसिल कार्यालय अलिबाग येथे ५ ऑक्टोबर व ७ डिसेंबर रोजी महसूल लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी दिली आहे.

या उपविभागातील अलिबाग व मुरुड तालुक्यातील व या न्यायालयातील संबंधित सर्व मान्यवर विधिज्ञ, संबंधित पक्षकार यांनी अपिलांचा जलद गतीने निपटारा करण्याचे असल्याने दाखल असलेल्या अपिल प्रकरणांमध्ये या न्यायालयात महसूल लोक अदालतीमध्ये उपरोक्त दिवशी आयोजीत होणाऱ्या सुनावणीचे दिवशी संबंधित विधिज्ञ व त्यांचे पक्षकार यांनी समेटाने मिटणाऱ्या प्रकरणांमध्ये लेखी म्हणणे न चुकता सादर करावे, असे उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी आवाहन केले आहे.





**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - आंबिवली - बुद्रुक, तालुका कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अविनाश दत्तात्रय पातकर | ४२ | २/ड | ०.४२.७० | ०.४१ |
| अविनाश दत्तात्रय पातकर | ४२ | ४ | ०.१८.०० | ९.५० |

वर वर्णन केलेली शेतजमिन मिळकतींच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील शेतजमिन मिळकतींशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतींच्या खरेदीच्या व्यवहारस हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १९/०९/२०२६

अधिवक्ता
**श्री.संपत पांडुरंग हडप**
कार्यालय :- विहंग अपार्टमेंट, गाळा नं ५,६,
कोतवाल नगर, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९८२२००६८५२/८४८४८९०३३९
९०२८५५६४४७/९३७१८९९९५६

**सार्वजनिक नोटीस**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मालमत्तेसंदर्भातील मूळ मालमत्ता दस्तऐवज दस्त क्र पवल-२-५५३९/२०१५, दस्ताचा प्रकार करारनामा (विक्रीचा करारनामा) हा दस्तऐवज पीरामल फायनान्स लि यांच्या ताब्यातून गहाळ/हरवलेला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट क्र. सहावा मजला, ''प्रिया आर्केड'', प्लॉट क्र. २८, सेक्टर-२ अ, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ अंदाजे १७.४१६ चौ. मी. कार्पेट एरिया व ७.०१७ चौ. मी. C. B./ F.B./टेरेस/EL./ S.S. एरिया, प्लॉट क्र.२८, सेक्टर क्र. २ अ करंजाडे येथील असून, सदर मालमत्ता श्री. सचिन नामदेव अंबाळे यांच्या मालकीची आहे.

वरील नमूद मूळ करारनामा (विक्रीचा करारनामा), दस्त क्र पवल -२-५५३९/२०१५ हा दस्तऐवज पीरामल फायनान्स लि. यांच्या ताब्यात असताना गहाळ/हरवलेला असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर मालमत्ता व/किंवा वरील नमूद मूळ दस्तऐवजाबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था, प्राधिकरण अथवा इतर कोणत्याही व्यक्ती/संस्थेचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, तारण, बोजा, भार, अडथळा किंवा कोणत्याही स्वरूपाचा संबंध असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे/संपर्क साधावा.

जर वरील १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत कोणताही दावा, हरकत किंवा लेखी कळविणे प्राप्त झाले नाही, तर सदर मूळ दस्तऐवजाबाबत कोणत्याही व्यक्तीचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, तारण, बोजा किंवा अन्य कोणताही भार/अडथळा नाही, असे गृहीत धरले जाईल. तसेच त्यानंतर करण्यात येणारा कोणताही दावा किंवा हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**संपर्कासाठी पत्ता**
ऑफिस क्र. ०५, पहिला मजला, नेमिनाथ शॉपिंग सेंटर,
स्टेशन रोड, मुद्रे (बु), कर्जत,
जिल्हा रायगड -४१०२०१
संपर्क क्र.: ९५९४९३०८८९

दिनांक : १९/०९/२०२६
ठिकाण : कर्जत

सही/-
**ॲड. प्रणित भिंगारदिवे**


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• TANNA FINSERV शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्क: ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : कोणावर अतिविश्वास टाकू नका. परिस्थितीत अनुकूल बदल होतील. आर्थिक बाबतीत विचार करा.
- **वृषभ** : विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. तुर्तास गुंतवणुकीचा विचार करू नये.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात आपली बाजू वरचढ ठरेल. वरिष्ठांशी सल्लामसलत महत्त्वाची राहील. बाकी चिंता नको.
- **कर्क** : व्यवसायात स्थिती साधारण राहील. आर्थिक व्यवहार विचारानं करावे. विद्याथर्थ्यांना यश लाभेल.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात इतरांशी जमवून घ्या. जमा–खर्चाचा ताळमेळ राखावा. कौटुंबिक मतभेद टाळायला हवे.
- **कन्या** : अनावश्यक खर्च टाळावा. वरिष्ठांच्या तुमच्याकडून अपेक्षा वाढतील. पित्ताचे विकार संभवतात.
- **तूळ** : तुमच्या कर्तृत्त्वाची इतरांवर छाप पडेल. हाती घेतलेलं कार्य सफल होईल. हातून शुभकार्य घडेल.
- **वृश्चिक** : व्यवसायवृध्दीच्या उत्तम संधी लाभतील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. समाधानी रहाल.
- **धनु** : जबाबदारीची जाणीव ठेवावी. नव्या ओळखी कामी येतील. प्रवासात मौल्यवान वस्तू सांभाळाव्या.
- **मकर** : कामात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. गुंतवणूक विचारानं करावी.
- **कुंभ** : कामाचा व्याप वाढेल. धावपळ, दगदगीमुळे प्रकृती अस्वास्थ राहील. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहील.
- **मीन** : मिळणाऱ्या संधींचा लाभ घ्यावा. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. गैरसमजांपासून दूर रहावं.

## स्टाईल स्टेटमेंट — स्टायलिश बॉट्म्स

✻ पेटल पँट हा सुद्धा बॉटमचा ट्रेंडी प्रकार आहे. पेटल पँट्स कोणत्याही समारंभाची शान ठरतील. ही पँट नी लेंग्थ कुर्ती आणि अनारकलीवर शोभून दिसेल.

✻ चुडीदारही सदाबहार फॅशन आहे. ही बॉटम कधीच आउट ऑफ फॅशन होत नाही. चुडीदारमध्ये तुम्ही उंच दिसू शकता. कुर्ता, अनारकली यापैकी कशावरही चुडीदार शोभून दिसेल.

✻ पटियाला सलवारही चांगला पर्याय आहे. या सलवारवर शॉर्ट कुर्ती शोभून दिसते. रंगीत किंवा प्लेन पटियाला सलवार कॅरी करता येईल. त्यावर छानशा दुपट्टा घेऊन तुमचा लूक खुलवता येईल.

✻ हेरम पँटवर कुर्त्यासह शर्ट किंवा क्रॉप टॉप घालता येईल. इंडो–वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी तुम्ही हेरम पँट ट्राय करा.

✻ पलाझो आणि कुर्ता हे कॉम्बिनेशनही छान दिसतं स्ट्रेट कुर्त्यावर पलाझो शोभून दिसतात.

## १९ सप्टेंबर — दिनविशेष

**२००७ :** २०–२० क्रिकेटमध्ये एकाच षटकात सहा षटकार मारण्याची कामगिरी करणारा युवराज सिंग हा पहिला क्रिकेटपटू ठरला.
**२०१३ :** पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या अमेरिका दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अणुकरारावरुन पुन्हा वाद उफाळला.
**२०१४ :** प्रख्यात मेंडोलिन वादक यू. श्रीनिवास यांचे निधन.
**२०१७ :** अमेरिकेने ‘एच १ बी’ व्हिसाची स्थगित प्रक्रिया पुन्हा सुरू केली.

## फन टाईम — विश्व जिम्नॅस्टिक्सचं

मुलामुलींनो, जिम्नॅस्टिक्स हा जगातल्या सर्वात जुन्या क्रीडाप्रकारांपैकी एक आहे. जिम्नॅस्टिक्सचे विविध प्रकार आहेत. ॲक्रोबिक, ऱ्हिदमिक, आर्टिस्टिक असे प्रकार पहाणं रंजक ठरतं. खेळाडूही १०० टक्के योगदान देण्याचा प्रयत्न करतात. ऑलिम्पिकमध्येही जिम्नॅस्टिक्सचा समावेश असतो. ऑलिम्पिक ही जगातली सर्वात मोठी क्रीडास्पर्धा आहे. ऑलिम्पिकमध्ये जिम्नॅस्टिक्सच्या फ्लोर एक्सरसाइज, वॉल्ट पोमेल हॉर्स, रिंग्ज, पॅरेलल बार्स, हॉरिझाँटल बार, अनइव्हन बार आणि बॅलन्स बीमसह विविध प्रकारच्या आठ इव्हेंट्स होतात. महिला आणि पुरुष जिम्नॅस्ट्ससाठी वेगवेगळ्या इव्हेंट्सचं आयोजन केलं जातं. बॅलन्स बीम आणि अनइव्हन बार्स या इव्हेंट्स फक्त महिलांसाठीच असतात. फ्लोर एक्सरसाइज, वॉल्ट, पॉमेल हॉर्स, स्टील रिंग्ज, पॅरेलल बार्स आणि हॉरिझोंटल बार्स हे पुरुषांचे इव्हेंट्स आहेत तर अनइव्हन बार्स, बॅलन्स बीम आणि फ्लोर एक्सरसाइज अशा इव्हेंट्स फक्त महिलांसाठी असतात. ऱ्हिदमिक म्हणजेच लयबद्ध जिम्नॅस्टिक्समध्ये बॉल, हूप्स, रिबन, रस्सी या वस्तूंचा वापर होतो. जिम्नॅस्टिक्स हा अनोखा खेळ म्हटला पाहिजे.

## आरोग्यमंत्र — जंतूसंसर्गाकडे दुर्लक्ष नको

जंतूसंसर्ग होणं ही वरकरणी साधी समस्या वाटते. मात्र दुर्लक्ष केल्यास यामुळे सेप्सिस नावाचा रोगही होऊ शकतो. सेप्सिसवर वेळीच उपचार न झाल्यास रूग्णाचा मृत्यू होण्याचीही शक्यता असते.

सेप्सिसमध्ये रक्ताभिसरण प्रक्रियेवर परिणाम होतो. यामुळे शरीरावर सूज येते आणि रक्ताच्या गुठळ्या तयार होतात. सहाजिकच विविध अवयवांना ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळत नाहीत. म्हणूनच वेळीच लक्ष देऊन सेप्सिसच्या लक्षणांकडे लक्ष द्यावं आणि उपचार करून घ्यावे. असं झालं नाही तर अवयव निकामी होण्याची शक्यता असते.



याला सिव्हियर सेप्सिस असं म्हणतात. त्यापुढच्या टप्प्याला सेप्सिस शॉक असं म्हटलं जातं. यामध्ये रूग्णाचा मृत्यूही ओढावू शकतो. हा धोका टाळण्यासाठी याच्या लक्षणांकडेही लक्ष पुरवायला हवं. प्लेटलेट्स कमी होणं, लघवीचं प्रमाण कमी होणं, सतत अशक्तपणा जाणवणं, शरीराचं तापमान कमी झाल्याने थंडी वाजणं, श्वास घ्यायला त्रास होणं अशी लक्षणं दिसल्यास तातडीने तपासणी करुन घ्यायला हवी कारण ही सेप्सिसची लक्षण आहेत. जंतूसंसर्गामुळे उद्भवू शकणाऱ्या या समस्येप्रती सर्वांनीच सजग रहायला हवं. मात्र प्रतिकारशक्ती कमी असल्यास, मधुमेह असल्यास, एचआयव्ही बाधित रूग्णांना तसंच लहान मुलं किंवा ज्येष्ठ नागरिक यांना हा विकार होण्याचा धोका अनेक पटीने वाढतो. म्हणूनच अशा लोकांनी सेप्सिसप्रती अधिक दक्ष राहणं गरजेचं ठरतं.

## फॅशन पॅशन

तुम्ही सहज म्हणून आजूबाजूला नजर टाकतील तर निळ्या रंगाचा शर्ट घातलेले दहा पैकी पाच लोक तरी तुम्हाला दिसतील. निळ्या रंगाचे कपडे घातले की कोणतीही चूक होणार नाही, असं बऱ्याच मुलांना वाटतं. पण मुलांनी आता या समजातून बाहेर पडायला हवं. निळ्या रंगाचा मोह बाजूला सारून काहीतरी वेगळं ट्राय करायला हवं. म्हणूनच तुम्ही एखादा हिरवा शर्ट खरेदी करा. मुलांचं फॅशनविश्व झपाट्याने बदलतं आहे. त्यामुळे आता प्रयोग करायला काहीच हरकत नाही. मग खरेदीचे बेत आखल्यानंतर हिरव्या रंगाचा विसर पडू देऊ नका.

## पंचांग

**शनिवार, १९ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद शु. ८, चंद्रराशी : धनु, नक्षत्र : मूळ, योग : आयुष्मान, सूर्योदय ६.२९, सूर्यास्त ६.३६

## फॉरवर्ड्स

**इन्सान के क़िरदार क़ी दो हीं मंज़िलें हैं...**

**या दिल में उतर जायें या दिल सें उतर जायें...!**

## करिअरवाटा — निर्णय घ्या पण...

निर्णयक्षमता हा गुण असेल तर यशोप्राप्तीतले अडथळे वेगाने दूर होतात याबाबत दुमत असण्याचं कारण नाही. पण घेतले जाणारे निर्णय केवळ वेगानं नव्हे तर विचारपूर्वक घेतले पाहिजेत. घाईगडबडीनं निर्णय घेताना एखाद्या गोष्टीची नकारात्मक प्रतिक्रिया म्हणून आपण



असे तडकाफडकी निर्णय घेत आहोत का, याचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. इंग्रजीमध्ये ‘वेट ॲन्ड वॉच’ असा सल्ला दिला जातो. त्यामध्ये कोणतीही कृती करताना किंवा निर्णय घेताना थोडी वाट पहा आणि निरीक्षण करून नंतरच निर्णय घ्या असं सुचवलं आहे. ‘पॉज ॲन्ड डिसाईड’ हा देखील पाळावा असा नियम आहे. एखादा वक्ता भाषण करताना काही क्षण थांबतो किंवा एखादं महत्त्वपूर्ण वाक्य उच्चारण्यापूर्वी क्षणभर शांत उभा राहतो आणि नंतर वाक्य उच्चारतो. त्या थांबण्याला, शांत बसण्याला पॉज असं म्हटलं जातं. कोणताही निर्णय घेण्याचा विचार मनात आल्यानंतर अशाच प्रकारे एक पॉज घ्यावा आणि नंतरच निर्णय घ्यावा. या काळात आपण नकारात्मक भावनेतून निर्णय घेत आहोत की आणखी विचार करायला हवा हे स्पष्ट होतं. अशा पध्दतीनं विचारपूर्वक घेतलेला निर्णय केव्हाही हितावह ठरतो.

## खेचाखेची — गणित

**गुरुजी** : बाळू, तुझ्या बाबांकडे १० रुपये आहेत. तू त्यातले ५ रुपये मागितले, तर त्यांच्याकडे किती रुपये शिल्लक रहातील?
**बाळू** : सर, १० रुपये.
**गुरुजी** : तुझं गणित फार कच्चं आहे का रे?
.
.
.
**बाळू** : नाही सर, तुम्ही माझ्या बाबांना ओळखत नाही.

## वेगळं काही

परदेशात पाळीव प्राण्यांची जास्त काळजी घेतली जाते. प्राण्यांचेही काही हक्क असतात आणि या हक्कांची पायमल्ली होणं खपवून घेतलं जात नाही. इथे सगळं नियमानुसारच करावं लागतं. ऑस्ट्रेलियातही असाच एक नियम लागू करण्यात आला आहे. या नियमानुसार पाळीव कुत्र्याला दिवसातून एकदा मोकळ्या हवेत फिरायला नेणं बंधनकारक करण्यात आलं आहे. ऑस्ट्रेलियात ॲनिमल वेल्फेअर विधेयकात काही बदल करून ते सादर करण्यात आलं. हे विधेयक मंजूर झालं आणि लागूही करण्यात आलं आहे. यामुळे पाळीव प्राण्यांची नीट देखभाल करावी लागणार आहे. प्राण्यांची देखभाल केली नाही तर २७०० डॉलरचा दंडही ठोठावण्यात येणार आहे.

## रुचिरा — काकडीची रुचकर भजी

आपण काकडीची कोशिंबीर, थालपीठ असे अनेक पदार्थ करतो. सॅलेडमध्येही काकडी हा महत्त्वपूर्ण घटक असतो. पण काकडीची भजीही करता येतात, याचा कधी विचार केलाय? कल्पनाशक्तीला थोडा ताण दिला तर उपवासाला चालणारा हा चटपटीत पदार्थही करता येईल. काकडीची ही भजी जिभेची भूक भागवू शकतात.



साहित्य – एक वाटी शिंगाड्याचं पीठ, दोन टीस्पून सैंधव, अर्धा टी स्पून हिरवी मिरचीचे तुकडे, चिरलेली कोथिंबीर, दोन मोठ्या काकड्यांचे पातळ काप, तेल इत्यादी.

कृती – या भज्यांसाठी शक्यतो मोठी काकडी वापरावी. सर्वप्रथम शिंगाड्याचं पीठ, सैंधव, हिरवी मिरचीचे तुकडे, कोथिंबीर हे सगळं साहित्य एकत्र करून घ्यावं. ते घट्ट होईल इतपत पाणी मिसळावं. एकजीव करुन काही वेळ तसंच ठेवावं. त्यानंतर यात काकडीचे काप बुडवावे आणि तुपात तळून घ्यावेत. आधी काप हाफ बॉईल करावेत. सर्व्ह करण्यापूर्वी पुन्हा एकदा भुऱ्या रंगावर तळून घ्यावेत. यामुळे भजी अधिक क्रिस्पी होतात.

## सुडोकू १५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६ | १ | ५ | ७ | | | | |
| ३ | | ७ | | | २ | १ | | ९ |
| | | | ९ | | | | | |
| | | | ७ | | ९ | | २ | |
| २ | | ८ | | ४ | | ३ | | ७ |
| | ३ | | २ | | ८ | | | |
| | | | | | ५ | | | |
| ८ | | ४ | ३ | | | २ | | ५ |
| | | | | ८ | ६ | ७ | १ | |

**टीप** -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १५० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ९ | ३ | १ | ४ | ८ | ५ | २ | ६ |
| १ | ४ | ६ | ९ | ५ | २ | ३ | ८ | ७ |
| ८ | २ | ५ | ३ | ६ | ७ | ४ | १ | ९ |
| ३ | ५ | ४ | ७ | १ | ६ | २ | ९ | ८ |
| ६ | ७ | २ | ४ | ८ | ९ | १ | ३ | ५ |
| ९ | १ | ८ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ४ |
| ५ | ८ | १ | ६ | ९ | ३ | ७ | ४ | २ |
| २ | ३ | ९ | ५ | ७ | ४ | ८ | ६ | १ |
| ४ | ६ | ७ | ८ | २ | १ | ९ | ५ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १५१

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ■ | ८ | ९ |
| | ■ | १० | ११ | ■ | १२ | | | | ■ | | ■ | १३ | | |
| १४ | १५ | | | १६ | ■ | | ■ | ■ | १७ | | १८ | | ■ | |
| ■ | | ■ | १९ | | २० | | २१ | २२ | ■ | २३ | | | २४ | ■ |
| २५ | | २६ | | ■ | | ■ | २७ | | २८ | | ■ | २९ | | ३० |
| ३१ | | | ■ | ३२ | | ३३ | | ■ | | ■ | ३४ | | ■ | |
| | ■ | ३५ | ३६ | | ■ | ३७ | | ३८ | ■ | ३९ | | | ४० | |
| ■ | ४१ | | | ■ | ४२ | | ■ | ४३ | | | ■ | ■ | | ■ |
| ४४ | | ■ | ४५ | ४६ | | ■ | ४७ | | ■ | ४८ | ४९ | ५० | | ■ |
| ■ | ५१ | | ■ | | ■ | ५२ | | ■ | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ |
| ५६ | | ■ | ५७ | | ५८ | | ■ | ५९ | ■ | ६० | | ■ | ६१ | |
| ■ | ६२ | | | ■ | ६३ | | | | | ■ | ६४ | ६५ | | ■ |
| ६६ | | ■ | ६७ | | ■ | | ■ | | ■ | ६८ | ■ | | ■ | ६९ |
| | ■ | ७० | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | | ७४ | | ■ | |
| ७५ | | ■ | ७६ | | ■ | ७७ | | | | ■ | ७८ | | | |

**आडवे शब्द :–**
१) खूप, फार, अतिशय
३) माणूस, आदमी
६) कृश होणे वाळणे
८) सर्प
१०) बगळा
१२) श्रीयुत
१३) अपहार
१४) तात्काळ
१७) आरडाओरड, कल्लोळ
१९) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२३) समशेर
२५) छिद्रातून जमिनीवर पडणारा प्रकाश
२७) रात्रभर
२९) निराश
३१) सापाची एक जात
३२) युक्ती
३४) एक द्विदल धान्य
३५) विहिरीतून पाणी काढण्याचे विशिष्ट प्रकारचे भांडे
३७) मन स्वाधीन असलेला, लहरी, निधड्या छातीचा
३९) वाहतूक
४१) चाकरी करणारा
४२) देणारा
४३) निमित्त
४४) आरोप
४५) शपथ
४७) पराभवाची माळ
४८) एकाद्यास मृत्युपासून वाचविणे
५१) कान
५२) पाणी
५३) एक प्रश्नार्थक शब्द
५४) पुरुष
५६) फायदा
५७) होडी, जहाज इ
६०) मोठी सुरी
६१) अमृत
६२) बुटका, बटु
६३) आकाशाला भिडणारे
६४) विष
६६) मालक
६७) अहंकार, ताठा
७०) जीव
७१) मृत्यू नसलेला
७३) लाकूड कापण्याचे साधन
७५) श्रम, मेहनत
७६) नर्तन
७७) राजाला, वरिष्ठाला दिलेली भेट वस्तू
७८) उंट हाकणारा

**उभे शब्द :–**
१) अमर्याद
२) विडा साहित्याचे ताट
४) सारखा
५) राजा
६) घोडा
७) कमळाचे तळे
८) तात्पर्य
९) मातीचा दिवा
११) जेमतेम, मोठ्या मुश्किलीने
१३) वस्तुंच्या जागा सारख्या बदलणे
१५) चिकटविणे
१६) मातीचा कण
१८) शंकर
२०) अंड्यातील पिवळा भाग
२१) प्राचीन
२२) पद्धत
२४) वल्लरी
२५) पंकज
२६) भित्रा
२८) मदत
३०) शांत करणे
३२) एक रत्न
३३) माया, प्रेम
३४) पाणी
३६) कापडाचा एक प्रकार
३८) घेणे, अंगीकार
३९) गोव्याची राजधानी
४१) छचोर चाळे करणारी स्त्री
४२) किंमत
४६) संपूर्ण
४७) त्रास, कष्ट
४९) सिंह
५०) दरवाजा
५२) आपले राष्ट्रगीत
५५) गाढव
५७) लोकसंख्येची मोजणी
५८) यज्ञ
५९) उंदीरासारखा एक प्राणी
६१) परमेश्वर
६५) एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हाती देणे
६६) हिंमत, धैर्य
६८) नवऱ्याचा भाऊ
६९) नशीब
७२) पराग
७३) मणका
७४) व्रत

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | त | दा | र | ■ | क | त | वा | र | ■ | रा | ■ | स | हा | य्य |
| ज | प | ■ | जा | ■ | स | सा | ■ | ज | रा | ज | र्ज | र | ■ | ■ |
| ल | ■ | वा | चा | वी | र | ■ | ध | नी | ■ | व | ■ | दा | द | र |
| द | ग | द | ग | ■ | ■ | ना | व | ■ | ■ | ट | स | र | ■ | ज |
| र | ज | ■ | ज | न | प | द | ■ | र | मा | ■ | वा | स | ला | त |
| म | र | ती | क | ■ | री | ■ | खं | ■ | य | दा | ■ | रो | ख | ■ |
| ज | ■ | ■ | र | हा | ट | गा | ड | गे | ■ | वा | स | व | ■ | आ |
| ल | प | वि | णे | ■ | ■ | रा | ■ | ला | ल | न | ■ | र | क्ष | क |
| ■ | द | र | ■ | क | था | ■ | को | बा | ■ | ल | ता | ■ | मा | स |
| मु | ■ | ज | व | ळ | पा | स | ■ | जा | स्त | ■ | त | न | या | ■ |
| का | र | ण | ■ | स | ■ | मा | हे | र | ■ | ह | ■ | वा | च | क |
| द | वा | ■ | अ | ■ | आ | धा | र | ■ | सु | म | न | ■ | क | द |
| म | न | क | व | डा | ■ | न | ■ | पा | र | खा | ■ | वे | ■ | र |
| ■ | गी | ■ | सा | ल | डे | ■ | न | र | ■ | स | दा | स | र्व | दा |
| सा | ■ | आ | न | न | ■ | च | क्र | वा | क | ■ | स | ण | ■ | न |

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
१९३७-२०२६ वर्ष ९०
www.krushival.in
शनिवार, दि. १९ सप्टेंबर, २०२६


# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● नागाव ग्रामपंचायत सदस्य सुरेंद्र नागलेकर यांनी केलेली श्रींची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चोंढी सातिर्जे येथील संदिप कृष्णा राउल यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची भव्य सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● अलिबाग तालुक्यातील सहाण गावचे रहिवासी श्री. (शाम) मंगेश ना. पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गणेशाची आकर्षक गणपती मूर्ती.



● नेरळ शिवसेना शाखेचे माजी शिवसेना शहरप्रमुख तथा वीर भाई कोतवाल नाभिक समाज नेरळ अध्यक्ष श्री.भाऊ क्षीरसागर यांच्या निवासस्थानी स्थापन झालेला लाडका बाप्पा (छायाचित्र : कांता हाबळे)



● अनिल नारायण वर्तक रा.ओंकार फ्रेंड्स सर्कल, वरसोली, अलिबाग



● श्री.सागर म्हात्रे, मु.तळ-बामणगाव, ता.अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची आकर्षक मूर्ती, (छायाचित्र-अब्दुल सोगावकर )



● श्री.वैभव गोसावी, मु.अलिबाग, यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची सुबक मूर्ती व आकर्षक देखावा, (छायाचित्र-अब्दुल सोगावकर )



● श्री.प्रमोद गोपीनाथ घरत, मु.पो.कुरूळ, अलिबाग



● श्री. विकास परशुराम रणपिसे, मु.कोळीवाडा (मधला पाडा) अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणराय. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● कर्जत तालुक्यातील धामोते गावातील कोल्हारे ग्रमपंचायत मा. सदस्या साक्षी सोमनाथ विरले, भावना विरले, रंगनाथ गणपत विरले आणि ओंकार सोमनाथ विरले यांनी एकत्रितपणे हे सुंदर पारंपरिक मखर साकारले आहे. (छायाचित्र :कांता हाबळे)



● अलिबाग तालुक्यातील खंडाळा ग्रामपंचायत हद्दीतील रूळे मधला पाडा येथील जगन्नाथ बाळकृष्ण घरत यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती मूर्तीसह गौरीची मूर्ती.



● श्री. रमेश शांताराम पाटील, मु. परहूर, ता. अलिबाग, यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची आकर्षक व सुंदर मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

## संस्कारांसोबत कलागुणांना मिळाले व्यासपीठ

### ● श्लोक पाठांतर व चित्रकला स्पर्धांना बालगोपालांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

१०५ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या रोह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट, रोहा २०२६ यांच्या वतीने श्लोक पाठांतर व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धांना बालकलाकार व बालगोपालांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे तसेच स्मरणशक्तीचे दर्शन घडविले.

चित्रकला स्पर्धेत लहान गटात श्रीजा परेश शिंदे हिने प्रथम क्रमांक पटकावला. निष्ठा मनोज साबळे हिने द्वितीय, तर माही गणेश तेलंगे हिने तृतीय क्रमांक मिळविला. मोठ्या गटात प्राक्ती मितेश भोईर हिने प्रथम, नीरजा परेश शिंदे हिने द्वितीय, तर संस्कृती संतोष शिंदे हिने तृतीय क्रमांक



मिळविला.

चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अमेय जोशी, तसेच मंडळाचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी बालकलाकारांच्या उत्साहाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

दरम्यान, श्लोक पाठांतर स्पर्धेलाही बालगोपालांचा मोठा प्रतिसाद मिळाला. लहान गटात सान्वी रोहन कोठावळे हिने प्रथम, आधिराज निलेश शिर्के याने द्वितीय, तर मीहीरा नितेश गुरव हिने तृतीय क्रमांक मिळविला. मोठ्या गटात प्रथम मिलिंद गुडेकर याने प्रथम, प्राची परशुराम पवार हिने द्वितीय, तर वरद सागर ओक याने तृतीय क्रमांक पटकाविला.

श्लोक पाठांतर स्पर्धेसाठी विजया उल्हास गोखले यांनी परीक्षक म्हणून सेवा बजावली. दोन्ही गटांमध्ये मिळून तब्बल ४० ते ४५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. पारंपरिक संस्कार, श्लोक पठण आणि चित्रकलेच्या माध्यमातून बालकांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत अनोळखी महिलेचा मृत्यू

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत-कडाव मार्गावर लाखरन गावच्या हद्दीत अज्ञात वाहनाने पादचारी महिलेला धडक दिल्याने तिचा मृत्यू झाला. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास शिवतेज ढाब्याजवळ हा अपघात झाला. अपघातानंतर वाहनचालकाने जखमी महिलेला रुग्णालयात न नेता तसेच पोलिसांना माहिती न देता वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांच्या माहितीनुसार, ६० ते ६५ वर्षे वयोगटातील अनोळखी महिला कडावच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरून चालत असताना अज्ञात वाहनाने तिला धडक दिली. या अपघातात महिलेला गंभीर दुखापती झाल्या आणि तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक श्रेणी पोलीस उपनिरीक्षक धबडे तपास करीत आहेत.

## ४८ हजारांची तांब्याची कॉईल लंपास

**खालापूर :** मानकिवली, शिरवली, सावरोली, वावर्ले, टेंभरी, रिलायन्स जिओ आणि दर्डा फार्म परिसरातील ट्रान्सफॉर्मरची मोडतोड करून त्यातील ४८ हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या कॉईल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. ३० ऑगस्ट ते १५ सप्टेंबरदरम्यान हा प्रकार घडला. अज्ञात चोरट्यांनी महावितरणच्या संमतीशिवाय ट्रान्सफॉर्मर पोलवरून खाली पाडून त्याची मोडतोड केली. त्यानंतर ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याची कॉईल काढून नेण्यात आली. या प्रकारामुळे महावितरणचे आर्थिक नुकसान झाले आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सांगळे तपास करीत आहेत.

## कर्जत तालुक्यात २५९८ गौरींचे पूजन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गौरी गणपती सणाला फार महत्त्व आहे. या सणाला कुठेही असलेला माणूस आपल्या घरी येतो. गणरायाच्या प्राणप्रतिष्ठे नंतर दोन-तीन दिवसांनी गौरीचे आगमन होते. काही ठिकाणी फुलांच्या तर काही ठिकाणी मूर्तीच्या गौरींचे पूजन करण्यात येते. त्यानंतर घरातील व शेजारील सुवासिनी गौरीचा ओवसा घेतात. यंदा हा सोहळा उत्साहात पार पडला. यंदा कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३४१, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत १२४६, माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ अशा २५९८ गौरींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

गणेश चतुर्थीला श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात येते. कुणी दीड दिवसांनी, कुणी पाच दिवसांनी, कुणी गौरींबरोबर, कुणी वामन नवमी तर कुणी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जन करतात. मात्र गौरींचे आगमन एकाच वेळी होते. कुणी मूर्तीची गौर पूजतात, तर कुणी आदल्या दिवशी पहाटेच रानात जाऊन गौरी



(छायाचित्र : संजय गायकवाड)

पूजनाच्या पूर्वसंध्येपर्यंत कचोऱ्याची फुले (गौरीची फुले) व तेरड्याच्या फुलांसकटच्या फांद्या आणतात. त्यानंतर महिला रात्रभर गाणी गात गौर सजवण्यात गुंततात साडी नेसवून गौर सजवून त्यावर मुखवटा आणि पुठ्ठ्याचे हात लावून खुर्चीवर गौर बसवितात. कुणाच्या उभ्या गौरी, तर कुणाच्या नाचऱ्या गौरी असतात. त्यांचे पूजन मात्र सारख्याच पद्धतीचे असते.

दुपारी गौरीचे पूजन झाल्यावर घरातील सुवासिनी नटूनथटून सुपामध्ये पूजेचे साहित्य घेऊन गौरीचा ओवसा घेतला. विशेष म्हणजे, नववधूने हा ओवसा घेतलाच पाहिजे, असे परंपरेनुसार ठरलेले आहे. यावेळी त्यांनी उकडलेल्या पिठांचे दिवे लावून गौरींना ओवाळले. या सोहळ्याचा आनंद बहुतांश घरातील सुवासिनींनी घेतला. बऱ्याच ठिकाणी केवळ गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. काहींची गौर एकच असते. अशा ठिकाणी सारे कुटुंबीय गौराई असलेल्या मोठ्या घरी एकत्रित झाले आणि गौरीपूजानाचा आनंद लुटला.

## गौराईच्या आगमनाने चैतन्य

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर तिसऱ्या दिवशी सोनपावलांनी गौराईचे आगमन झाल्याने पाताळगंगा परिसरात सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. कोकणातील गौरी-गणपतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गौराईला माहेरवाशिणीचे स्थान असल्याने महिलांनी तिचे पारंपरिक पद्धतीने स्वागत व पूजन केले.

बदलत्या काळानुसार गौराईच्या सजावटीतही मोठे बदल झाले आहेत. पूर्वी कागदी मुखवटा तयार करून गौराईला खुर्चीवर बसवून नवी कोरी साडी, हातात बांगड्या, गळ्यात सौभाग्य अलंकार, नाकात नथ, वेणी तसेच रुईच्या पानांचा वापर करून सजावट केली जात असे. मात्र, प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची मागणी वाढल्याने घरच्या घरी पारंपरिक पद्धतीने सजविलेली गौराई आता ग्रामीण भागातही तुरळक



ठिकाणीच पाहावयास मिळत आहे. गौराईच्या आगमनानंतर महिलांनी तेरड्याच्या झाडांचा गुच्छ, तेरड्याची फुले तसेच विविध नैसर्गिक साहित्याने गौराईची सजावट केली. रानटी भेंडी, आघाड्याची पाने, तेरड्याची फुले, आईनाचे फळ, काकडी आदींचा वापर करून पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले. गौराईच्या जागरणाला विशेष महत्त्व असून, संपूर्ण रात्र महिलांनी जागरण करून विविध पारंपरिक गाणी म्हटली. तसेच विविध खेळांमध्ये सहभागी होत महिलांनी जागरणाचा आनंद लुटला.

# शाळेतच आर्थिक धडे

कर्नाटक सरकारने २०२७पासून राज्यातील सरकारी शाळांमध्ये आर्थिक साक्षरतेचे शिक्षण देण्याची तयारी केली आहे. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ९५६ सरकारी शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता पैशांचे नियोजन, बचत आणि आर्थिक व्यवहार समजावून देण्यामागे हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. आजच्या डिजिटल युगात लहान वयातच मुलांच्या हातात स्मार्टफोन आणि ऑनलाइन व्यवहार आले आहेत. त्यामुळे पैशांचा योग्य वापर, डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता आणि भविष्यासाठी आर्थिक नियोजन यांची प्राथमिक माहिती असणे गरजेचे झाले आहे. उपलब्ध माहितीनुसार, भारतातील प्रौढांमध्ये आर्थिक साक्षरतेचे प्रमाण अजूनही मर्यादित आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहारांचे धडे शालेय जीवनापासूनच मिळाल्यास पुढील पिढीला त्याचा मोठा फायदा होऊ शकतो.

कर्नाटकच्या शिक्षण विभागाने जारी केलेल्या माहितीनुसार, या उपक्रमात बँक अधिकारी, आर्थिक सल्लागार तसेच वाणिज्य आणि व्यवस्थापन महाविद्यालयांतील प्राध्यापक विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. बचत, डिजिटल पेमेंट, जबाबदारीने कर्ज घेणे, विमा आणि करव्यवस्थेची प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे.



**अर्थशिक्षण**

त्याचबरोबर बँकिंग, गुंतवणूक आणि शेअर बाजाराच्या मूलभूत संकल्पनांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आर्थिक व्यवहारांबरोबरच ऑनलाइन फसवणुकीपासून पैसे सुरक्षित कसे ठेवायचे, याची माहिती देणेही या शिक्षणाचा महत्त्वाचा भाग असेल. विशेष म्हणजे, आर्थिक शिक्षण हा केवळ परीक्षेत गुण मिळविण्याचा विषय न ठेवता प्रत्यक्ष जीवनाशी जोडण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, खिशातील पैसे कसे वापरायचे, गरज आणि हौस यातील फरक काय, खर्च केल्यानंतर बचत कशी करायची, अशा साध्या गोष्टींच्या माध्यमातून मुलांना पैशांचे महत्त्व सहज समजावून सांगता येऊ शकते.

आर्थिक साक्षरतेचे शिक्षण माध्यमिक स्तराऐवजी प्राथमिक शाळेपासूनच सुरू केल्यास त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो, असा विचारही या संदर्भात मांडला जात आहे. लहान वयात सवयी लागल्याने पुढे मोठे झाल्यावर उत्पन्न, खर्च, बचत आणि गुंतवणुकीचे नियोजन करणे तुलनेने सोपे जाऊ शकते. देशातील नव्या पिढीचे जीवन डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेशी अधिकाधिक जोडले जात असताना आर्थिक सुरक्षिततेचे ज्ञानही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे गोष्टी, खेळ, प्रत्यक्ष कृती आणि कार्यशाळांच्या माध्यमातून आर्थिक संकल्पना मुलांपर्यंत पोहोचविण्याचा मार्ग अधिक परिणामकारक ठरू शकतो. आर्थिक व्यवहारांची प्राथमिक समज लहान वयात निर्माण झाली तर भविष्यात चुकीचे कर्ज, अनावश्यक खर्च, ऑनलाइन फसवणूक किंवा अविचारी गुंतवणुकीचे धोके कमी करण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे शाळेतच पैशांचे योग्य नियोजन शिकविण्याची कल्पना विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाची पायाभरणी ठरू शकते.

# ‘हरवलेली’ भाषा सापडली!

अरुणाचल प्रदेशातील दुर्गम डोंगररांगांमध्ये २०१० मध्ये संशोधकांना ‘कोरो’ नावाची अशी भाषा आढळली, जिची भाषाशास्त्रीय जगाला त्यापूर्वी माहिती नव्हती. ग्रेगरी अँडरसन ‘अका’ आणि ‘मिजी’ भाषांचा अभ्यास करण्यासाठी तेथे गेले होते. स्थानिकांशी संवाद साधताना त्यांना तिसरीच वेगळी भाषा ऐकू आली. कोरोची ध्वनीरचना, शब्दजुळणी आणि वाक्यरचना अका भाषेपेक्षा वेगळी असल्याचे स्पष्ट झाले. अका भाषेत डुकरासाठी ‘वो’, तर कोरोमध्ये ‘लेले’ हा शब्द वापरला जातो. पर्वतासाठीही दोन्ही भाषांत वेगवेगळे शब्द आहेत. स्थानिक मात्र कोरोला अका भाषेची बोली मानत होते.



कोरोचा उगम जुन्या गुलाम व्यापाराशी जोडला जाऊ शकतो, असा संशोधकांचा तर्क होता; मात्र त्याची निश्चित पुष्टी झालेली नाही. या शोधाने भाषिक जगासमोर एक नवा प्रश्न उभा केला.

**वेगळे काही**

२०१० मध्ये कोरो बोलणाऱ्यांची संख्या आठशे ते हजार होती. त्यातील बहुतांश जण वीस वर्षांवरील होते आणि भाषेचे स्वतंत्र लिखित स्वरूप नव्हते. त्यामुळे ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचेल का, हा प्रश्न निर्माण झाला. कोरोचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी संशोधकांना दुर्गम गावांमध्ये डोंगर चढून, बांबूच्या तराफ्याने नदी ओलांडून जावे लागले. त्यांनी शब्दसंग्रह, वाक्यरचना, कथा आणि पारंपरिक बोलण्याच्या पद्धती ध्वनिमुद्रित केल्या. आधुनिक नोंदींमध्ये कोरो स्वतंत्र आणि धोक्यात असलेली भाषा मानली जाते. तरुण पिढीचे मातृभाषेपासून दूर जाणे ही त्यामागची कारणे आहेत.

कोरोची कहाणी भाषिक वैविध्य किती नाजूक आहे, याची जाणीव करून देते. भाषेतील प्रत्येक शब्दासोबत समाजाची स्मृती, पर्यावरणाचे ज्ञान, लोककथा, श्रद्धा आणि जगाकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी जपलेली असते. त्यामुळे भाषा नष्ट होणे म्हणजे शब्दांचा अंत नव्हे, तर अनुभवांचे एक जग हरवणे होय. २०१० मध्ये अँडरसन आणि गणेश मुर्मू यांनी कोरोची नोंद प्रसिद्ध केली होती. तिचे ध्वनिमुद्रण, शब्दसंग्रह आणि व्याकरण जतन करणे महत्त्वाचे आहे. एखादा शेवटचा वक्ता गप्प झाला की त्या भाषेसोबत एक वेगळे जगही शांत होते.

# असा आहे आपला मेंदू

मुलामुलींनो, आपला मेंदू शरीरावर नियंत्रण ठेवतो. मेंदूमार्फत शरीराच्या विविध अवयवांना संदेश पोहोचवला जातो. आपल्या मेंदूचं वजन दीड किलोपर्यंत असतं. मानवी मेंदू खूप सक्षम असतो. आपल्या मेंदूमध्ये बरेच सेन्सर्स आणि प्रोसेसर्स असतात. माणसाच्या मेंदूवर आजवर बरंच संशोधन करण्यात आलं आहे. आपला मेंदू एका सेकंदात जवळपास १०० कोटी क्रिया करू शकतो. काय, वाचून आश्चर्य वाटलं ना? पण हे खरं आहे. माणूस आपल्या मेंदूच्या क्षमतेपैकी फक्त दहा टक्के क्षमतेचाच वापर करतो, असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात हा गैरसमज आहे. माणूस संपूर्ण मेंदूचा वापर करतो. जागेपणीच नाही तर झोपेतही मेंदूचं काम सुरू राहतं. माणूस झोपेतही मेंदूची दहा टक्क्यांपेक्षा जास्त क्षमता वापरतो.

**जाणून घ्या**

मेंदूचा आकार आणि बुध्यांक किंवा हुशारी यांचा काहीच संबंध नसतो. आता स्पर्म व्हेलच्या मेंदूचा आकार मानवी मेंदूपेक्षा पाच पटींनी मोठा असतो. पण माणूस स्पर्म व्हेलपेक्षा जास्त हुशार असतो. त्यामुळे मेंदूचा आकार आणि हुशारी यांचा काहीच संबंध नाही हे तुमच्या लक्षात आलं असेल...



# इजिप्तची देवीमाता : नाईल

नाईल ही जगातील सर्वात लांब नदी मानली जाते. ती सुमारे६,६५० किलोमीटरलांब आहे. नाईल नदीचे दोन प्रमुख प्रवाह आहेत. व्हाईट नाईल आणि ब्ल्यू नाईल. व्हाईट नाईलचा उगम पूर्व आफ्रिकेतल्या व्हिक्टोरिया सरोवरातून होतो. तर ब्ल्यू नाईलचा उगम इथिओपियातील टाना सरोवरातून होतो. हे दोन्ही प्रवाह सुदानची राजधानी खार्तूम येथे मिळतात आणि पुढे एकत्र इजिप्त देशातून वाहत भूमध्य समुद्रात मिळतात.



**जीवनदायिनी**

इजिप्तचे प्राचीन नाव मिसर आहे. नाईल नदीमुळेच प्राचीन मिसर संस्कृती विकसित झाली. नदीच्या काठावर सुपीक माती असल्याने शेती हा प्रमुख व्यवसाय बनला.नाईल नदी तिच्या रुंद पात्रामुळे वाहतुकीसाठी आणि मासेमारीसाठीही महत्त्वाची ठरली. प्राचीन इजिप्शियन लोक नाईलच्या प्रवाहाला आकाशाचा देवओसिरिसयांचा आशीर्वाद मानतात. जेव्हा नाईलचे पाणी वाढते, तेव्हा देव ओसिरिस लोकांना समृद्धी देतो असे मानले जाते.

आणखी एका कथेनुसार, एकदा दुष्काळ पडला आणि नाईलचे पाणी आटले. लोकांनीओसिरिसची प्रार्थना केली. ओसिरिसची पत्नी देवी इशिसला लोकांची दया आली. तिने नदीला पुन्हा भरभरून पाणी दिले. इजिप्तमधील लोक म्हणतात, की त्या दिवसापासून नाईलचे पाणी कधीही आटत नाही.

नाईल नदीवर अनेक मोठी धरणे आणि वीजकेंद्रे आहेत.अस्वान शहराजवळ बांधलेले अस्वान हाय डॅम हे सर्वात मोठे धरण आहे. या धरणामुळेलेक नासेरनावाचे कृत्रिम सरोवर तयार झाले आहे.हे जगातील सर्वात मोठ्या कृत्रिम सरोवरांपैकी एक आहे.ब्ल्यू नाईलवरील रोजरेस धरण, सुदान येथीलमेर्वे धरण हीआणखी काही महत्वाची धरणे आहेत. इथिओपिया येथे २०११ पासून बांधकाम सुरू असलेला ग्रँड इथिओपियन रेनेसाँस डॅम हा ब्ल्यू नाईलवरील आफ्रिकेतील सर्वात मोठा हायड्रोइलेक्ट्रिक प्रकल्प आहे.

# बना व्हीएफएक्स तज्ज्ञ

अनेकांनी व्हीएफएक्सबद्दल ऐकलं असेल. चित्रपट, मालिका, व्हिडिओ गेम्समध्ये विविध इफेक्ट्सचा वापर होतो. हे विज्युअल इफेक्ट्स असतात. यालाच व्हीएफएक्स तंत्रज्ञान असं म्हटलं जातं. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचा वापर करून दृश्यं तयार केली जातात. चित्रपटातली ही दृश्यं बघून आपण टाळ्या पिटतो. सध्या व्हीएफएक्सला बरीच मागणी आहे. हे क्षेत्र विस्तारत जाणार आहे. त्यामुळे तुम्ही व्हीएफएक्स तंत्रज्ञ म्हणून काम करू शकता. या क्षेत्राविषयी. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचे तीन, सहा आणि बारा महिन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही संस्थांमध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रमही चालवला जातो. व्हिडिओ प्रोडक्शन, ग्राफिक डिझाइन, मोशन ग्राफिक्स, कॅमेरा ट्रॅकिंग, फिल्म रिस्टोरेशन अशी तंत्रं शिकवली जातील. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते. बारावी किंवा पदवीनंतर तुम्ही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. कॉम्प्युटरचं ज्ञान असेल तर या क्षेत्रात जास्त चांगली प्रगती करता येईल.

**कोण होणार?**

व्हीएफएक्स तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रपट, मालिका, ॲनिमेशन, व्हिडिओ गेम्स, ॲप्स, व्हिडिओ, जाहिराती तसंच मनोरंजनक्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकाल. माध्यमक्षेत्रात ग्राफिक डिझायनर तसंच व्हीएफएक्स तंत्रज्ञांना बरीच मागणी आहे. छोट्या शहरांमध्येही बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काही तरी वेगळं करायचं असेल तर व्हीएफएक्सच्या क्षेत्रात काम करायला हरकत नाही.



# तलावांचं शहर भोपाळ

आपण मध्य प्रदेशची राजधानी भोपाळबद्दल जाणून घेऊ. तलावांचं शहर अशी भोपाळची ओळख आहे. या शहरात तलावांची संख्या बरीच जास्त आहे. भोपाळमध्ये १५ पेक्षा जास्त छोटे-मोठे तलाव आहेत. भोपाळमध्ये वनविहार राष्ट्रीय उद्यानही आहे. दोस्त मोहम्मद खान यांनी भोपाळ शहर वसवलं. मुस्लीम राण्यांच्या काळात या शहराची खूप भरभराट झाली. इथली ताज-उल ही मशीद भारतातलीच नाही तर आशिया खंडातली सर्वात मोठी मशीद आहे. ही मशीद म्हणजे मुघल स्थापत्यकलेचा उत्तम नमुनाच आहे. भोपाळमध्ये गेल्यानंतर ताज महाल, बिर्ला मंदिर, मिंटो हॉल, मोती मशीद ही ठिकाणं बघायला हवीत. भोपाळमधला सुलेमानी चहा खूप प्रसिद्ध आहे. हा चहा गोड आणि खारट असतो. वेगळ्या चवीचा हा चहा एकदा तरी चाखायला हवा. इथला राजू टी स्टॉल खूप प्रसिद्ध आहे. सुलेमानी चहाप्रमाणेच भोपाळी पान खूप प्रसिद्ध आहे. यासोबतच लस्सीवाला फालुदा खाण्यासाठीही लोक इथे येतात.



# शाळा ‘रेल्वे डब्या’तली!

तामिळनाडूतील कोईम्बतूर जिल्ह्यातील पेथनायकनूर शासकीय माध्यमिक विद्यालयाने एका शिक्षकाच्या कल्पकतेमुळे वेगळे रूप धारण केले. काही वर्षांपूर्वी या शाळेकडे पालकांचे फारसे लक्ष नव्हते. २०१२ मध्ये शाळेत केवळ ७० विद्यार्थी होते. परिसरातील अनेक पालक मुलांना मोठ्या किंवा खासगी शाळांत पाठवत होते. २०१३ मध्ये तमिळ विषयाचे शिक्षक बालमुरुगन शाळेत रुजू झाले आणि त्यांनी परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला. विद्यार्थ्यांना शाळा आपलीशी वाटावी, शिकण्याची उत्सुकता वाढावी आणि शिक्षण पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जावे, यासाठी त्यांनी विविध उपक्रम सुरू केले. ओसाड परिसरात झाडे लावण्यापासून सुरुवात झाली. एका आठवड्यात ११० रोपे लावली गेली. पुढे विद्यार्थ्यांनी स्थानिक बियाणे गोळा करून बीजगोळे तयार केले. परिसरात आणि आजूबाजूला ९६० हून अधिक रोपांची लागवड झाली, तर पुनर्वनीकरणासाठी सुमारे ४५ हजार बीजगोळे तयार झाले.



वाचनसंस्कृतीलाही चालना मिळाली. छोट्या ग्रंथालयाचे रूपांतर सहा हजारांहून अधिक पुस्तकांच्या समृद्ध ग्रंथालयात झाले. विद्यार्थ्यांनी कविता, कथा आणि लेख लिहिण्यास सुरुवात केली.




शाळेत शिक्षण आणि स्थानिक संस्कृती यांचा सुंदर मेळ घालण्यात आला. विद्यार्थ्यांना परई इसई, मयिलाट्टम, ओयिलाट्टम, करगट्टम, कवडियाट्टम आणि कुम्मी या पारंपरिक तमिळ लोककलांचे प्रशिक्षण दिले जाते. खेळ, पर्यावरण, वाचन आणि लेखनालाही महत्त्व मिळाले. विद्यार्थिनी तमिळ अरसी हिचा पर्यावरणविषयक लेख तमिळनाडू सरकारच्या ‘थेंचिट्टू’ नियतकालिकात प्रसिद्ध झाला आणि लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. कोविडनंतर मात्र मुलांना पुन्हा शाळेत आणणे हे मोठे आव्हान होते.

या पुनरागमनाला आनंददायी बनवण्यासाठी बालमुरुगन यांनी वर्गखोल्यांना रंगीबेरंगी रेल्वेच्या डब्यांचे रूप देण्याची कल्पना मांडली. सुमारे ५० हजार रुपयांच्या खर्चातून हा बदल करण्यात आला. त्यापैकी ३५ हजार रुपये त्यांनी स्वतः दिले, तर उर्वरित रक्कम पालकांनी उभी केली. संगीत आणि उत्साहात विद्यार्थ्यांचे स्वागत झाले. वर्गात प्रवेश करताना रेल्वेच्या डब्यात शिरल्यासारखा अनुभव मिळाल्याने मुलांचा आनंद द्विगुणित झाला.

**विशेष**

या प्रयत्नांचा परिणाम विद्यार्थीसंख्येत स्पष्ट दिसला. २०१२ मधील ७० विद्यार्थ्यांची संख्या आता २१० हून अधिक झाली आहे. म्हणजेच विद्यार्थीसंख्या तिपटीहून अधिक वाढली. शाळेच्या माहितीनुसार, २०१५ पासून दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपराही कायम आहे. पालकांना या शाळेत केवळ परीक्षेचे शिक्षण नव्हे, तर आत्मविश्वास, शिस्त, सर्जनशीलता, पर्यावरणप्रेम आणि सांस्कृतिक जाणीव मिळत असल्याचे जाणवू लागले. या बदलात शिक्षकांसोबत पालक, विद्यार्थी आणि विविध संस्थांचाही सहभाग आहे. आज शाळेतील झाडे विद्यार्थ्यांना सावली देतात, हजारो पुस्तके कल्पनाशक्तीला विस्तार देतात, लोककला संस्कृतीशी जोडते आणि रंगीबेरंगी वर्गखोल्या शिकण्याला उत्साह देतात. शाळा म्हणजे केवळ चार भिंती नसून आनंदाने शिकण्याची जागा असावी, हा विचार पेथनायकनूरने प्रत्यक्षात आणला आहे.

# संगीताला जीवनदान देणारे वाद्य

भारतीय शास्त्रीय संगीतात तबला हे सर्वात महत्त्वाचे तालवाद्य मानले जाते. तबला आणि डग्गा अशी ही जोडी असते. या जोडीतील तबला उजव्या हाताने वाजवला जातो, तर बाया किंवा डग्गाडाव्या हाताने वाजवला जातो. चांगल्या प्रतीचा खैराचा किंवा शिसवी लाकडाचा तुकडा आतून कोरून पोकळ बनवला जातो.या पोकळ भांड्याच्या तोंडावर जनावरांचे चामडे घट्ट बसवण्यात येते. या कातडी आवरणास पुडी असे म्हणतात. यावर आणखी एक गोल किनार केवळ कडांवर बसवण्यात येते. यास चाट किंवा गोट म्हणतात. तबला आणि डग्गा यांच्या पृष्ठभागावर मधोमध काळी शाईसारखी गोलाकार पेस्ट लावलेली असते, तिला श्याही म्हणतात. तबल्याची पट्टी म्हणजेच आवाजाचा पोत शाईच्या थरावरून निश्चित होतो. ही पट्टी निश्चित करण्यास मुख्यत्वे बाजाच्या पेटीचा वापर करतात.ही श्याही ध्वनीला विशिष्ट स्वर आणि गडगडाट देते. वादन शैलीतील फरकांमुळे तबल्यात स्वतःची वेगळी वैशिष्ट्ये असलेली अनेक घराणी निर्माण झाली आहेत. दिल्ली घराणे,लखनौ घराणे, पंजाब घराणे, बनारस, इंदूर, फरूखबाद, अजवाडा ही तबलावादनातील प्रसिद्ध घराणी आहेत. तबल्याच्या बोल नावाच्या विशिष्ट ठेक्यांमधून विविध ताल रचले जातात. दादरा, कहरवा, झपताल, त्रिताल हे लोकप्रिय ताल आहेत. तबल्याचा वापर भक्तिगीत, भजन, नाट्यसंगीत, गझल, फिल्मी गाणी आणि आजच्या फ्युजन संगीतातही मोठ्या प्रमाणावर होतो. उस्ताद अहमद जान थिरकवा, अल्ला रक्खा, झाकीर हुसेन अशा अनेक महान कलाकारांनी तबल्याला जागतिक ओळख मिळवून दिली. तालाचे सौंदर्य आणि गती यामुळे तबला कोणत्याही संगीताला जीवनदान देतो.



## दोस्त हे मस्त

### असे हे पाणघोडे



पाणघोडा ही माशांची एक प्रजाती आहे. तोंडाचा आकार घोड्याच्या तोंडासारखा असल्यामुळे त्याला पाणघोडा असं म्हटलं जातं. पाणघोड्याची भूक प्रचंड असते. म्हणून ते सतत चरत असतात. पाणघोड्यांना पोट आणि दात नसतात. म्हणूनच उपासमार होऊ नये म्हणून त्यांना सारखं खावं लागतं. पाणघोडे आपल्या शेपटीचा वापर शस्त्रासारखा करतात. शत्रूपासून बचाव करण्यासाठी पाणघोडे रंग बदलतात. आसपासच्या वातावरणानुसार त्यांचा रंग बदलतो. त्यांचे दोन डोळे एकाच वेळी दोन ठिकाणी बघू शकतात. म्हणजे त्यांचा एक डोळा समोर बघत असेल तर दुसरा डोळा मागे बघू शकतो. म्हणजे पाणघोडे एकाच वेळी सगळीकडे लक्ष ठेऊ शकतात!

## खादाडी

### गरमागरम नूडल सूप



थंडीच्या दिवसात गरमागरम सूप प्यावंसं वाटतं. तुम्हाला नूडल्सही आवडतात. मग मस्तपैकी नूडल्स सूप बनवता येईल. यासाठी दोन गाजरं, एक टोमॅटो, बारीक चिरलेला कोबी, थोडी कांद्याची पात, एक चमचा तेल, अर्धी सिमला मिरची, मीठ, नूडल्स आणि एक चमचा कॉर्नफ्लोर असं साहित्य घ्या. सर्व भाज्यांचे छोटे तुकडे करा. आता एका कढईत तेल गरम करून घ्या. त्यात भाज्या घालून दोन मिनिटं परता. यात चार कप पाणी आणि नूडल्स तसंच मीठ घाला. आता दहा मिनिटं शिजू द्या. आता वाटीत थोडं पाणी घ्या. त्यात कॉर्नफ्लोर आणि मिरपूड घाला. नीट मिसळून घ्या. हे मिश्रण सूपमध्ये घाला. मिनिटभर शिजवा. अधूनमधून हलवत रहा. गॅस बंद करा. तुमचं सूप तयार आहे.

## स्टडी टिप्स

### करा उजळणी



गणिताची भीती तुम्ही अगदी सहज घालवू शकता. यासाठी सराव आणि उजळणी या दोन गोष्टी लक्षात ठेवा. गणिताची प्राथमिक सूत्रं असतात. ही सूत्रं लक्षात ठेवली की तुम्हाला गणित जमलंच म्हणून समजा. गणिताची सूत्रं समजून घेण्यासाठी जुनी पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचा. पुस्तकं वाचून काही समजलं नाही तर शिक्षकांची मदत घ्या. पाया बळकट असेल तर गणिताचा पेपर कधीच कठीण जाणार नाही.

## योगा टाईम

### वक्रासन करून वाढवा उत्साह



सारखा कंटाळा येत असेल, अभ्यास करण्यात, खेळण्यात किंवा कोणत्याही कामात उत्साह वाटत नसेल तर योगासनं करता येतील. काही योगासनांमुळे तुमच्यात उत्साहाचा संचार होऊ लागतो. अभ्यासात, खेळण्यात उत्साह येण्यासाठी तुम्ही वक्रासन करू शकता. हे अगदी सोपं आसन आहे. हे आसन केल्यानंतर तुमचा सगळा आळस दूर निघून जाईल.

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● नागाव हटाळे येथील सौ. प्रज्ञा प्रफुल्ल वार्डे यांचे इथली श्री गणरायाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● थळ पेठ येथील सौ. स्मिता एकनाथ थेरोंडेकर यांचे इथली गणरायाची स्वत: केलेली मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● कनकेश्वर फाटा येथील सौ. अश्वनी अरूण मोकल यांचे इथली श्रींची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चोंढी किहीम गावचे प्रथम नागरिक प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड यांनी साकारलेली गौरीसह गणरायाची केलेली आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चोंढी येथील सौ. स्वप्नल संदिप आमले यांनी केलेली गौरीसह गणेशाची मनमोहक सजावट (छायाचित्र : सुरेश खडपे)



● झिराड येथील आदरणीय प्रकाशदादा ठाकूर यांनी साकारलेली श्री गणेशाची सुंदर सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● कातळपाडा सातिर्जे येथील श्री राजनभाई गोविंद नार्वेकर यांनी केलेली विघ्नेश्वराची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● माणगाव तालुक्यातील सुर्ले मोर्बा येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते विजय (राजू) चंद्रकांत मोरे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● महाड तालुक्यातील कुंबळे गावी धारिया कुटुंबियांतर्फे स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● माणगाव नगरपंचायत हद्दीतील संगमेश्वर नगरातील रहिवासी सचिनकुमार भानुदास गोरेगावकर (फेटेवाले) यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते सुभाष भगवान पारखे यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख)



● कै. परशुराम हरी पाटील, मु. कामार्ले, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी गेल्या शंभर वर्षापासून सामाईक गणेशोत्सव साजरा करतांना सर्व पाटील कुटुंबिय आणि मित्रमंडळी. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. रोहिदास हरिश्चंद्र चव्हाण, मु. चणेरा, सुडकोली, ता. रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गौरी व गणपती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. मेहुल खारकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव.



● श्री. सुरज भगत यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)



● श्री. अक्षय शशिकांत मानकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)



● कदम परिवार यांच्या घरी गणरायाचे आगमन झाले व अनेक भक्तगणांनी दर्शनाचा लाभ घेतला. कदम मंडप डेकोरेटर कदम कन्स्ट्रक्शन वाई. श्री. अशोक महादेव कदम.



● श्री. अक्षय शशिकांत मानकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रति भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)